# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ६० शुक्रवार दि.०५ सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## राज्यातील मोठी धरणे तुडूंब, पाणीसाठा ९३ टक्क्यांवर



मुंबई : प्रतिनिधी राज्यात सर्वदूर झालेल्या दमदार पावसामुळे मोठे धरण प्रकल्प तुडूंब भरले आहेत. मोठ्या धरणांतील पाणीसाठा ९३.१२ टक्क्यांवर गेला आहे. मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा ७७.८३ टक्के तर लघु प्रकल्पातील पाणीसाठा ५७.१८ टक्क्यांवर गेला आहे. मोठ्या, मध्यम आणि लघु, अशा २९९७ धरणांतील एकूण पाणीसाठा ८५.७९ टक्क्यांवर गेला आहे.

यंदा पाऊस चांगला झाल्याने राज्यातील मोठी धरणे तुडूंब भरली आहेत. मोठ्या धरणांतील पाणीसाठा ९३.१२ टक्क्यांवर गेला आहे. राज्यात एकूण २५९९ लघु प्रकल्प आहेत. या प्रकल्पातील पाणीसाठा ५७.१८ टक्क्यांवर गेला आहे. या प्रकल्पांतील एकूण पाणीसाठा ३९४८ दलघमी इतका झाला आहे.

धरणांमधील पाणीसाठ्यात कोकण विभागाने आघाडी घेतली आहे. मोठ्या, मध्यम आणि लघु, अशा सर्वच प्रकारच्या धरण प्रकल्पांचा विचार करता, कोकण विभागातील धरणांत ९२.५५ टक्के, पुणे विभागात ९१.४९ टक्के, नाशिक विभागात ७९.३२ टक्के, छत्रपती संभाजीनगरमध्ये ८१.१० टक्के, अमरावती विभागात ८४.९७ टक्के आणि नागपूर विभागात ७७.९८ टक्के पाणीसाठा झाला आहे.

नागपूर विभागातील मोठ्या धरणांत ७६.७५ टक्के पाणीसाठा आहे. उर्वरीत सर्व विभागात ९० टक्क्यांहून जास्त पाणीसाठा झाला आहे. पुणे, कोकण विभागात ९७ टक्के, नाशिकमध्ये ९३ टक्के, छत्रपती संभाजीनगरमध्ये ९४ टक्के आणि अमरावती विभागातील धरणांत ९१ टक्के पाणीसाठा झाला आहे.

लघु प्रकल्पांत पाणीसाठा कमी राज्यात एकूण २५९९ लघु प्रकल्प आहेत. या प्रकल्पातील पाणीसाठा ५७.१८ टक्क्यांवर गेला आहे. या प्रकल्पांतील एकूण पाणीसाठा ३९४८ दलघमी इतका झाला आहे. नाशिक, पुणे विभागातील लघु प्रकल्पांतील पाणीसाठा ५० टक्क्यांवरही गेला नाही.

मराठवाड्यातील धरणे फुल्ल !

मराठवाड्यातील सर्वात मोठे जायकवाडी धरण ९८.६१ टक्क्यांनी भरले आहे .गेल्या वर्षी जायकवाडीत याच सुमारास ४७.६४% पाणी साठा होता .बीडचे मांजरा धरण ९८.९४ टक्क्यांवर गेले आहे तर माजलगाव धरणात ९४.७२% पाणीसाठा आहे .गेल्यावर्षी या दोन्ही धरणांमध्ये ३०.२१% व १२.२१% अनुक्रमे पाणीसाठा होता .

हिंगोलीच्या सिद्धेश्वर आणि येलदरी धरणात ९५% च्या पुढे पाणीसाठा झाला आह.नांदेडच्या विष्णुपुरी धरणात ८२.६८% जलसाठा झाला असून निम्नमनार धरण १०० टक्क्यांनी भरले आहे . धाराशिव मधील निम्न तेरणा प्रकल्प ९८.४७% तर सीना कोळेगाव प्रकल्प ९९.४५% भरला आहे .परभणीतील निम्न दुधना प्रकल्प ७३.३५टक्क्यांनी भरलाय . मराठवाड्यातील एकूण ४४ धरण प्रकल्पांमध्ये ९४.३४% पाणीसाठा झालाय.हा पाणीसाठा गेल्यावर्षी ५१.७७% एवढा होता .

नाशिक ,पुण्यातील धरणांची काय परिस्थिती ?

नाशिक व नगर जिल्ह्यातील धरणांमध्ये ९३.१६% उपयुक्त पाणीसाठा झाला . भंडारदरा निळवंडे धरण शंभर टक्के भरले आहे .नाशिकचे भाम धरण १०० टक्के भरले असून दारणा ९७.६० गंगापूर ९७.९८% झाले आहे .

पुण्यातील निरा देवघर, चाकसमान, भाटघर ,टेमघर, मुळशी टाटा, ठोकरवाडी टाटा ही धरणे १००% भरली असून पवना ८७.८९% तर खडकवासला ९७.६०% झाले आहे .पानशेत धरणात ९९.९६% पाणीसाठा झाला .

कोल्हापुरातील राधानगरी प्रकल्प ९९.२५ टक्क्यांनी भरला आहे तर दूधगंगा धरणात ८२.७८% पाणी झालंय .सांगलीतील वारणा धरण ९६.६८ टक्क्यांनी भरले आहे तर साता-यातील कोयना ९८.४९ टक्क्यांवर पोहोचले .सोलापुरातील उजनी धरण १०० टक्क्यांनी भरले आहे.

## पनीर, दूधसह अनेक वस्तू स्वस्त

नवी दिल्ली : वृत्तसंस्था-नवी दिल्लीत जीएसटी कौन्सिलची ५६ वी महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत ५ टक्के आणि १८ टक्के जीएसटी दरप्रणालीला मंजूरी देण्यात आली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी याबाबत माहिती दिली. जीएसटी परिषदेच्या या निर्णयामुळे देशभरातील सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे इलेक्ट्रॉनिक वस्तू, खाद्यपदार्थ, साबण, कपडे, पादत्राणे यासह रोजच्या वापराच्या गोष्टी स्वस्त होणार आहेत. तर आरोग्य विमा आणि जीवन विम्यात पूर्ण सूट मिळण्याची शक्यता आहेत. सरकारचा हा निर्णय नवरात्रीच्या पहिल्या दिवशी म्हणजे २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहे. जीएसटी परिषदेने मात्र सोन्यावरील जीएसटी दर बदललेला नाही.

सोने आणि चांदीवरील जीएसटी दर आहे तोच ठेवण्याचा निर्णय घेतला. सोने आणि चांदीवर ३ टक्के जीएसटी आणि दागिने बनवण्याच्या शुल्कावर ५ टक्के जीएसटी लागू राहील. उदाहरणार्थ, जर तुम्ही १ लाख रुपयांचे सोने आणि चांदी खरेदी केली तर तुम्हाला त्यावर ३००० रुपये जीएसटी भरावा लागेल.

सोने अन् चांदीच्या किंमतीत वाढ

सोने आणि चांदीच्या किमतीत वाढ होण्याचा ट्रेंड सुरूच आहे. भारतीय सराफा बाजारात आज देखील म्हणजेच ४ सप्टेंबर रोजी सोने आणि चांदीच्या किमतीत वाढ दिसून आली आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या मते, २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत १०८६९५ रुपयांवर पोहोचली आहे. त्याचवेळी, चांदीच्या किंमतीतही वाढ दिसून आली आहे.

औषधे स्वस्त होणार

आरोग्य विमा, पनीर पराठा, परोटा,खाकरा, चपाती, तंदूर रोटी, दूध, पिझ्झा, ३३ जीवनरक्षक औषधे, गंभीर आणि दुर्मिळ आजारांवरची औषधं, पेन्सिल, शार्पनर, क्रेयॉन्स, खोडरबर, वह्या, नकाशे, चार्ट, ग्लोब या वस्तूंवर शून्य टक्के जीएसटी लागणार आहे.

पुढील वस्तूंवर फक्त ५ टक्के जीएसटी

इलेक्ट्रीक गाड्या, केसांचे तेल, शाम्पू, टूथपेस्ट, टूथ ब्रश, साबण, दाढीचे साबण, बटर, तूप, चीज, पाकिटातले नमकीन, भुजिया, मिक्श्चर, बाळाची दुधाची बाटली, डायपर, नॅपकिन्स, शिलाई मशिन आणि तिचे सुटे भाग, थर्मोमीटर, ग्लुकोमीटर आणि टेस्ट स्ट्रीप्स, चष्मे, रोगनिदानाची उपकरणे, ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचे टायर्स, सुटे भाग, जलसिंचन, तुषारसिंचनाची उपकरणे, कृषी उपकरणे, कृषी फवारणी औषधांवर फक्त ५ टक्के जीएसटी आकारण्यात येणार आहे.

## जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी ३० सप्टेंबरपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

लातूर :- जागतिक कौशल्य स्पर्धा ही जगातील सर्वात मोठी व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा असून, ४८ वी जागतिक कौशल्य स्पर्धा २२ ते २७ सप्टेंबर २०२६ दरम्यान चीनमधील शांघाय येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरीय कौशल्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. यासाठी इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत https://www.skillindiadigital.gov.in या वेबपोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी वयोमर्यादा हा एकमेव निकष निश्चित करण्यात आला आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ५० क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे. तसेच, डिजिटल कन्स्ट्रक्शन, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सिक्युरिटी, आयसीटी नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर, ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, इंडस्ट्रियल डिझाइन टेक्नॉलॉजी, इंडस्ट्री ४.०, मेकॅट्रॉनिक्स, ऑप्टोइलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी, रोबोट सिस्टम्स इंटिग्रेशन, वॉटर टेक्नॉलॉजी, डेंटल प्रोस्थेटिक्स आणि एअरक्राफ्ट मेंटेनन्स या क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे.

या स्पर्धेच्या आयोजनाबाबत राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद (एनएसडीसी) यांच्याकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर स्पर्धा आयोजित करून निवडलेल्या उमेदवारांची नावे जागतिक नामांकनासाठी पाठवली जातील. जिल्हास्तरीय कौशल्य स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीद्वारे निश्चित केलेल्या कौशल्य आणि पात्रता निकषांनुसार, इच्छुक आणि पात्र उमेदवार ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत https://www.skillindiadigital.gov.in या वेबपोर्टलवर नोंदणी करू शकतील.

या संधीचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त कौशल्यप्राप्त युवक-युवतींनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी यंग प्रोफेशनल दत्तात्रय कांबळे (मो. नं. ९०२८२३८४६५) यांच्याशी संपर्क साधावा किंवा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्रप्रशाला, क्रीडा संकुलासमोर, ओसा रोड, लातूर येथे प्रत्यक्ष भेट द्यावी, असेही श्री. सूर्यवंशी यांनी आवाहन केले आहे.

## श्री गणेश विसर्जनासाठी महापालिकेची तयारी पूर्ण

लातूर/प्रतिनिधी:प्रदूषण टाळण्यासाठी शहरातील नागरिकांनी आपाल्या घरी स्थापित केलेल्या गणेश मूर्तींचे विसर्जन जलाशयात न करता मनपाच्या संकलन केंद्रांकडे त्या मुर्ती द्याव्यात.सार्वजनिक गणेश मंडळांनी १२ नंबर पाटी येथील खदानीत विसर्जन करावे,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.मुर्ती संकलनासाठी पालिकेकडून ४३० अधिकारी,कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

दि. २७ ऑगस्ट रोजी स्थापित केलेल्या श्रीगणेशाचे शनिवारी (दि.६ सप्टेंबर ) विसर्जन होणार आहे.शहरातील नागरिक व भक्त गणरायाला निरोप देणार आहेत.प्रथेप्रमाणे श्रीगणेशाच्या मुर्तीचे जलाशयात विसर्जन केले जाते.गेल्या कांही वर्षापासुन मनपा गणेश मूर्ती संकलन केंद्र कार्यान्वित करते.गणेशभक्तांनी आपल्या मुर्ती संकलन केंद्रात देण्याचे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे.

सार्वजनिक गणेश मंडळांना आपल्या मोठ्या मूर्तीचे १२ नंबर पाटी जवळील खदानीत विसर्जन करता येणार आहे.यासाठी संबंधित मंडळांनी स्वतःच्या वाहनाने मूर्ती तेथपर्यंत आणाव्यात. श्री सिध्देश्वर मंदीर परिसर,कव्हा रोड, बांधकाम भवन या ठिकाणी मिरवणुकी नंतर श्री गणेश मुर्तीचे संकलन करण्यात येणार आहे.

घरगुती गणेश मंडळांसाठी मनपाकडून शहरात ठिकठिकाणी संकलन केंद्र उभारण्यात आली आहेत.या ठिकाणी मनपाचे कर्मचारी दिवसभर उपस्थित राहून मुर्तींचे संकलन करणार आहेत.याच केंद्रावर निर्माल्य संकलन करण्यासाठी कलश ठेवण्यात येणार आहेत.नांदेड रस्त्यावर यशवंत शाळा,विवेकानंद चौकातील पाण्याची टाकी,मंठाळे नगरमध्ये मनपा शाळा क्रमांक ९, सिध्देश्वर मंदिर, जिल्हाधिकारी कार्यालया जवळील शासकीय विहीर,बार्शी रस्त्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची पाण्याची टाकी,दयानंद महाविद्यालयाचा पार्किंग परिसर,सरस्वती कॉलनीतील पाण्याची टाकी,टाऊन हॉल, बांधकाम भवन,कव्हा रस्त्यावर खंदाडे नगर, साळे गल्लीतील यशवंत शाळा,तिवारी यांची विहीर,गणेश नगर व काशी विश्वेश्वर मंदिर ग्रीन बेल्टसिद्धेश्वर मंदिर, गणेश चौक सार्वजनिक गणेश मंदिर या ठिकाणी यावर्षी मूर्ती संकलन केंद्र उभारली जाणार आहेत. गणेश मूर्ती विसर्जन सुरळीत व्हावे यासाठी चार नोडल अधिकारी १७ पथक प्रमुख व ४०९ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

श्री गणेश विसर्जना वेळी आपल्याकडील गणेश मूर्ती मनपाने उभारलेल्या संकलन केंद्रात द्याव्यात. पालिकेकडून या सर्व मूर्तीचे १२ नंबर पाटीवरील खदानीत विधीवत विसर्जन केले जाणार आहे.नागरिक व गणेश भक्तांनी या उपक्रमात मनपाला सहकार्य करावे,,असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## ओबीसींमध्ये अस्वस्थता वाढली

मुंबई : प्रतिनिधी-राज्य सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्याचा जीआर सरकारने तात्काळ काढला. यामुळे जरांगे पाटील यांचे आंदोलन शमले. पण यामुळे आता ओबीसींमध्ये अस्वस्थता पसरली असून, ओबीसींच्या हक्कावर गदा येत असेल तर मोठे आंदोलन पुकारावे लागेल, असा इशारा दिला आहे. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ सरकारच्या जीआर काढण्याच्या निर्णयावर प्रचंड नाराज आहेत. आजच्या राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीवर त्यांनी बहिष्कार घातला. एका जातीला दुस-या जातीत टाकण्याचा अधिकार कोणत्याही सरकारला नाही. आम्ही आता वकिलांचा सल्ला घेत आहोत. लवकरच न्यायालयात जाणार असल्याचे भुजबळ म्हणाले.



दरम्यान, राज्य सरकारने भुजबळांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न सुरू केला असून मी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भुजबळांना वस्तुस्थिती समजावून देऊ, त्यांची नाराजी दूर करू, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. तसेच मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीच्या धर्तीवर ओबीसी समाजासाठीही स्वतंत्र मंत्रिमंडळ उपसमिती तयार करण्याचा निर्णय राज्यमंत्रिमंडळाने घेतला. जरांगे पाटील यांच्या बहुतांश मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या. हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीची घोषणा करण्यात आली. यामुळे कुणबी नोंदी असलेल्यांना प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. एका बाजूला मराठा आंदोलन शमल्याचा सुस्कारा राज्य सरकारने टाकला. पण आता ओबीसी समाजात निर्माण झालेल्या भावनेला छगन भुजबळ यांनी वाट मोकळी करून दिली.

बुधवारच्या राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीस छगन भुजबळ अनुपस्थित राहिले. मंत्रिमंडळ बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे होती. भुजबळ हेदेखील तिथेच होते. मात्र मंत्रिमंडळ बैठकीस न जाता भुजबळ तडक तिथून निघाले. भुजबळ काहीही न बोलता निघून गेले. त्यामुळे मग ते नाराज असल्याची आणखी चर्चा रंगली.

## माजी आमदार धिरज देशमुख यांच्या प्रयत्नाला यश

### जलसंपदा मत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे धिरज देशमुख यांच्या कडून आभार व्यक्त



लातूर :- राज्याचे जलसंपदामंत्री मा. ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांची लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी २१ मे २०२५रोजी त्यांच्या निवासस्थानी भेट घेवून मांजरा नदीवरील लातूर तालुक्यातील बोरगाव अंजनपूर निम्न पातळी बंधा-याचे स्वयंचलित दरवाजे क्षतिग्रस्त झाले असल्याने गोदावरी मुळी बंधा-याच्या धरतीवर उभ्या उचल पध्दतीचे नवे दरवाजे बसवण्या संदर्भात निवेदन देवून यास निधी देण्यात यावा अशी मागणी केली होती.

या मागणीची दखल घेवून सदरील कामासाठी रू. १३,९०,१५,७८० (तेरा कोटी नव्वद लाख पंधरा हजार सातशे ऐंशी) एवढ्या रकमेच्या अंदाजपत्रकास आज दि. ४ सप्टेंबर २०२५ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

शेतक-यांची अडचण लक्षात घेवून माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी पुढाकार घेवून बोरगाव अंजनपूर निम्न पातळी बंधा-यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करून घेतल्या बद्दल शेतक-यांकडून त्यांचे आभार व्यक्त केले जात आहेत.

## बोरगाव-अंजनपूर बंधारा नवीन स्वयंचलित दारवाजे बसवण्यासाठी १४ कोटीचा निधी मंजूर - आ. कराड

लातूर : - मांजरा नदीवर लातूर तालुक्यातील मौजे कानडी बोरगाव अंजनपूर निम्म पातळी बंधाऱ्याचे मुळी बंधाऱ्याच्या धरतीवर नवीन उभ्या उचल पद्धतीचे स्वयंचलित दरवाजे बसविण्यासाठी ज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने तब्बल १३ कोटी ९० लाख रुपयाचा निधी मंजूर केला असल्याची माहिती लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत लातूर तालुक्यातील मौजे कानडी बोरगाव गावाजवळ मांजरा नदीवर निम्मपातळीचा गेल्या २००८ साली बंधारा बांधण्यात आला. मागील काळात पूरपरिस्थितीत या बोरगाव अंजनपूर बंधाऱ्याचे सर्व सातही स्वयंचलित गोडबोले गेटचे भाग तुटून क्षतीग्रस्त झाल्याने बंधाऱ्यात पाणीसाठा होत नव्हता. बंधाऱ्याची दुरुस्ती करण्यात यावी अशी या परिसरातील शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस आणि जलसंपदा मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे लेखी तोंडी मागणी करून वेळोवेळी पाठपुरावा केला.



आ. रमेशआप्पा कराड यांच्या पाठपुराव्याला यश आले असून राज्याच्या जलसंपदा विभागाने ४ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार कानडी बोरगाव अंजनपूर या बंधाऱ्यास मुळी बंधाऱ्याच्या धरतीवर नवीन उभ्या उचल पद्धतीचे दहा बाय चार मीटर या आकाराचे एकूण सात दरवाजे बसविण्याच्या कामाला त्याचबरोबर साहित्याकरिता दक्षता कक्ष बांधकामासाठी व बंधाऱ्याच्या साहित्यासाठी तब्बल १३ कोटी ९० लक्ष १५ हजार रुपये एवढा निधी मंजूर केला आहे.

कानडी बोरगाव अंजनपूर निम्न पातळी बंधारा अनेक दिवसांपासून दुरावस्थेत असल्याने असून अडचण नसून खोळंबा याप्रमाणे त्या परिसरातील शेतकऱ्यांना कसलाच बंधाऱ्याचा फायदा होत नव्हता. शेतक-यांची होणारी गैरसोय लक्षात घेवून आ. रमेशअप्पा कराड यांनी या बंधा-याच्या कामाला प्राधान्य देत पाठपुरावा केला होता. निधी मंजूर झाल्याने लवकरच बंधाऱ्याचे काम होणार असून नवीन पद्धतीचे दरवाजे बसविण्यात आल्यानंतर बंधाऱ्यात शंभर टक्के पाणीसाठा होणे शक्य आहे. पुराचे साठलेले पाणी नदीपात्रात सोडणे, नदीकाठच्या भूभागात पाणी मुरून भूजल साठ्यात वाढ होईल. एकूणच बंधारा परिसरातील शेतकऱ्यांना निश्चितपणे मोठा फायदा होणार आहे. सदर कामासाठी १४ कोटीचा निधी मंजूर केल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि राज्याचे जलसंपदा मंत्री श्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## संपादकीय

### अमेरिकेपुढे आशियाचे आव्हान

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताविरुद्ध ५० टक्के टॅरिफ लादल्यानंतर सबंध आशिया खंडातील देश अमेरिकेविरुद्ध एकवटले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जपान आणि चीन दौरा हा आशियाई ऐक्याचा बुलंद आवाज म्हणून महत्त्वाचा आहे. विशेषतः २१ वे शतक हे आशियाचे शतक आहे, हे जगाला ठासून सांगण्याचा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी देत आहेत.

प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर २१ वे शतक हे आशियाचे शतक आहे. भारत आता विश्वगुरू म्हणून उदयास आला आहे आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या कार्यपद्धतीत सुधारणा असो, की जागतिक व्यापारातील असमतोल असो, या सर्व बाबतीत एक समन्यायी आणि संतुलित भूमिका घेऊन भारत जगाचे नेतृत्व करत आहे. हमास-इस्रायल संघर्ष शांततेने आणि कूटनीतीने सोडविण्यावर भारताचा भर आहे. तथापि, डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ बॉम्बने जगाची झोप उडाली आहे. अशावेळी अमेरिकेच्या दादागिरीला जबरदस्त प्रतिशह देण्याचे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत आणि चीन दौर्‍याचे भूराजनैतिक दृष्टीने विशेष महत्त्व आहे. त्यांच्या नव्या भूमिकेमुळे आशियाच्या राजकारणात सत्ता समतोलाचे नवे समीकरण मांडले जात आहे आणि भारताची नैतिक आध्यात्मिक आणि सामाजिक शक्ती जबरदस्त वाढली आहे. त्याचा प्रत्यय गेल्या महिनाभरातील घटना आणि घडामोडींमुळे येत आहे.

भारत-जपान मैत्रीचा नवसूर्य पुन्हा प्रकाशमान झाला आहे. भारताचे 'अ‍ॅक्ट ईस्ट' म्हणजे 'पूर्वेकडे पाहा आणि कृती करा' हे धोरण तसेच जपानचे पेन-एशिया धोरण या दोन्हींमध्ये एक समान सूत्र आहे. भारताने आग्नेय आशियाई देश, आशियान देश आणि हिंद प्रशांत क्षेत्रातील देश यांचे गेल्या दहा वर्षांत प्रभावीपणे संघटन केले आहे. त्यामुळे केवळ अलिप्तता वादाचे तुणतुणे न वाजविता भारत आता अधिक गतिमान झाला आहे. असे करताना भारत स्वहिताचे रक्षण करतो आणि हितसंबंधांचे रक्षण करताना त्याच्या मार्गात येणार्‍या कुठल्याही राष्ट्राला भीक घालणार नाही, ही भारताची रोखठोक भूमिका पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केली आहे. भारत-जपान मैत्रीचा नवसूर्य पुन्हा प्रकाशमान झाला आहे. जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्याशी झालेल्या सकारात्मक सुसंवादातून अनेक मौलिक रत्ने प्राप्त झाली आहेत.

जपानने भारतामध्ये ६८ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक संरक्षण क्षेत्रात करण्याचे ठरविले आहे. दोन्ही देशांनी परस्परातील सुरक्षा संबंध अधिक दृढ करण्याचे मान्य केले आहे. २१ वे शतक हे आशियाचे शतक आहे; परंतु या आशियाई शतकाला आकार व नवे रूप देण्याचे कार्य भारत व जपान यांना मिळून करावे लागणार आहे. भारतासारख्या बहुआयामी सांस्कृतिक आणि संपन्न राष्ट्राच्या ऐतिहासिक क्षमतांवर जपानचा विश्वास आहे. त्यामुळे जपानने भारताच्या विकासात विज्ञान, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधांचा विकास तसेच अत्यंत महत्त्वपूर्ण अशा वेगवान बुलेट ट्रेन प्रकल्पाची आखणी व अंमलबजावणी याबाबत जपान सहकार्यासाठी वचनबद्ध आणि कृतीबद्ध आहे. भारताची भक्कम लोकशाही प्रणाली आणि आर्थिक स्थिरता ही नव्या जगाचे आशास्थान आहे. किंबहुना भारत जसजसा सामर्थ्यवान होईल तसतसा नव्या जगात विकास आणि समृद्धीचा नवा मंत्र सर्व दूर घुमू लागेल.

भारताच्या प्रगती व स्थैर्यामध्ये विश्वाची प्रगती आहे, हे 'वसुधैव कुटुंबकम्' या बोधवाक्यातून भारताने जी-२० शिखर परिषदेस जगाला दाखवून दिले आहे. उद्योग क्षेत्रातील जपानची उत्कृष्टता आणि भारताची उद्यमशील गतिमान भागीदारी यामुळे जगामध्ये आणि विशेषतः आशियामध्ये प्रगती व स्थैर्याचा नवा अध्याय सुरू होऊ शकतो. दोन्ही देशांमधील आर्थिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक सहकार्य अधिक गतिमान होईल, असा विश्वास उभय नेत्यांनी व्यक्त केला तो सार्थ आहे. भारत २०३० पर्यंत ५०० जी जी वॅट अक्षय स्वच्छ ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करणार आहे, असे मोदी यांनी आत्मविश्वासपूर्व विधान केले. भारत जगाची कौशल्ये राजधानी म्हणून उदयास आला आहे आणि भारताचे कुशल कामगार जगाची प्रगती साध्य करण्यासाठी सर्व प्रकारच्या तांत्रिक गरजा पूर्ण करतील, हेसुद्धा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधोरेखित केले आहे. जपान हे तंत्रज्ञानाचे महाशक्ती ग्रह आहे. त्याच्या सहकार्य व सहयोगामुळे भारत आणि जपान नव्या जगात एक नवा चमत्कार घडवू शकतील, असा प्रबळ विश्वासही पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान मोदी यांच्या टोकियो दौर्‍यादरम्यान जपानने अमेरिकेला कसा प्रतिशह दिला, याचे एक अद्भुत उदाहरण समोर आले आहे. जपानने अमेरिकेसोबतचा ५४४ अब्ज डॉलर्सचा व्यापार करार रद्द केला आहे. त्याचे कारण असे की, जपानमधील शेतकरी अमेरिकेचा तांदूळ आपल्या देशात घेण्यास तयार नाहीत. जपानने अमेरिकेपुढे शरणागती पत्करू नये, नांगी टाकू नये अशी जपानी शेतकर्‍यांची भावना आहे. अमेरिकेने दाखविलेले गाजर जपानने नाकारले आहे. आता या गाजराची पुंगी ट्रम्प यांना वाजवावी लागेल. ट्रम्प यांच्या बेताल बडबडीमुळे हा करार जपानने रद्द केला आहे. त्यामुळे ट्रम्प यांचा तीळपापड होणे साहजिक आहे. अमेरिकेचा तांदूळ जपानच्या बाजारपेठेत येणे म्हणजे तेथील शेतकर्‍यांच्या पायावर कुर्‍हाड पडली असती. खुद्द जपानमधला शेतकरी अमेरिकेविरुद्ध तीव्र भावनांचा एल्गार प्रकट करत आहे. त्यामुळे जपानला पडत्या फळाची आज्ञा घेऊन हा करार रद्द करावा लागला. येथे नरेंद्र मोदी यांचे शहाणपण लक्षात घेतले पाहिजे. त्यांनी भारतीय बाजारपेठेत अमेरिकेची घुसखोरी रोखून धरली आणि कुठल्याही प्रकारच्या कृषी कराराला भीक घातली नाही. हा भारताचा रोखठोक दृष्टिकोन जपाननेसुद्धा अनुसरला आहे.

जपानी लोकांना चिकट भात आवडतो आणि त्यांचा तांदळाशी असलेला संस्कृतिक बंध त्यांना सोडवत नाही. त्यामुळे अमेरिकन तांदूळ त्यांनी साफ नाकारला, हे विशेष म्हटले पाहिजे. गेल्या दोन वर्षांपासून जपानमध्ये भारतीय तांदळाची आयात वाढली आहे. गेल्या वर्षी जपानने भारताकडून ५.७४ दशलक्ष डॉलर्स तांदळाची खरेदी केली होती. आता ही खरेदी दुप्पट होण्याची शक्यता आहे. जपानने अखेर ट्रम्प यांच्या खेळीला बळी न पडता वाटाण्याच्या अक्षता लावल्या. अमेरिकेच्या आशियाविरोधी धोरणाचा परिपाक म्हणजे जपान, चीन, रशिया यांची मैत्री होय. मैत्रीचा हा नवा त्रिकोण ट्रम्प यांची डोकेदुखी ठरू शकतो. अमेरिकेच्या टॅरिफ युद्धाला जबरदस्त प्रत्युत्तर म्हणून मोदी यांची ही कूटनीती सबंध जगापुढे एक नवा संदेश देत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जपान व चीन दौरा ही जगाच्या राजकारणातील सत्ता समतोलाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण घटना म्हटली पाहिजे.

# शिक्षकी पेशा सार्थ ठरविणारे.. नजीउल्ला शेख गुरुजी

बहुतांशी जण रोजगाराचे साधन,परिस्थतीमुळे आलेली संधी म्हणून शिक्षक झालेले पण काही वेगळ्या रसायनाचे व्यक्तीमत्व हे मुद्दामहून शिक्षकी पेशात येवून चाकोरी बाहेर जावून समाज,देशाची सेवा करतात तेव्हा त्यांच्या कार्याला वेगळीच दखलपात्र किनार असते,यात नांदगाव जिल्हा परिषद केंद्रीय शाळेचे व नांदगाव केंद्राचे प्रभारी मुख्याध्यापक नजीउल्ला बाशामियाँ शेख गुरुजी यांचा आवर्जून उल्लेख करावा वाटतो.. इस्लाम धर्माचे संस्थापक महमंद पैंगबर यांची जयंती आणि आज शिक्षक दिननिमित्ताने त्यांच्याप्रती मंगल कामना इच्छितो...

औसा तालुक्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेले खरोसा हे गाव.येथील निजामोद्दीन मुजावर हे तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक म्हणून सेवा बजावले.त्यांनी आपला मुलगा बाशामियाँला दहावी पर्यंतचे शिक्षण दिले. शिक्षणाचा वारसा लाभलेल्या या परिवारातील शहापूरबी-बाशामियाँ या दाम्प्त्यांच्या पोटी मुसा,ईसा,मेहरुनिस्सा,नजीउल्ला,शयनाश,अहेमदपाशा, ताहेराबानू ही सात अपत्ये झाली.बाशामियाँ हे आजही गावी खासगी शिकवणी घेतात,त्यांनी आपल्या या सर्व अपत्त्यांना किमान दहावीच्या पुढेच शिक्षण देवून खर्‍या अर्थाने शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले.यातील मुसा हे शामगिर विद्यालय कोतल शिवणी येथे कलाशिक्षक पदावर आहेत. नजीउल्ला जि.प.सहशिक्षक,तिसरे ईसा हे किराणा दुकान आणि मालवाहू टेम्पोचा व्यवसाय करतात.चौथे अहमदपाशा हे विद्युत सहाय्यक आहेत. कन्या त्यांच्या सासरी सुखात आहेत.या कुटूंबाला थोडीशी शेतीही आहे.

शिक्षणःशेख परिवारातील नजीउल्ला यांचे पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण गावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले.पाचवी ते आठवीपर्यंतच्या इयत्ता त्यांनी खरोसा येथील नवभारत विद्यालयातून केल्या. नववी व दहावी कोतल शिवणी येथील शामगीर विद्यालयात भावाच्या सानिध्यात पूर्ण झाले. १९९२ मध्ये दहावीला नजीउल्ला यांना ७९.१४ टक्के गुण मिळाले. मग त्यांनीही शिक्षकी पेशाची परंपरा चालविण्याचा निश्चय केला.त्यासाठी मुरुड येथील शासकीय अध्यापक विद्यालयात प्रवेश घेवून १९९२-१९९४ या दोन वर्षात त्यांनी डी.एड. पूर्ण केले.

आनंदाचा क्षणःवशिल्याच्या त्या काळात आपली काय दाळ शिजणार.. म्हणून नोकरी नाही म्हणून ते घरचे किराणा दुकान आणि पोल्ट्री फॉर्मवर भावासोबत काम करत राहिले.पण वेळ यावी लागतात म्हणतात तसे १९९६ मध्ये परभणी जिल्हा निवड मंडळाने शिक्षक भरतीची वृत्तपत्रात जाहिरात काढली होती,त्यानुसार नजीउल्ला यांनी लेखी अर्ज केला.निवड मंडळापुढे तोंडी परीक्षा दिली वाट पाहात राहिले. पण एके दिवशी ते असेच किराणा दुकानात बसले असता गावचा अमीन टप्पेवाला पोस्टमन तिथे आला.हातातील एक कागद खाली टाकत त्याने हे बग काय आलेय तुझं, म्हणत टेकला.नजीउल्लाने ते एक पानी तीन घड्या घालून टाचणी मारलेला कागद उघडून वरुन वाचले ...तेव्हा त्यांची शिक्षकी पेशासाठी निवड होवून त्याला नियुक्त्यांच्या जागी रुजू होण्यास सूचीत केले होते.ते वाचून नजीउल्लांच्या चेहर्‍यावर आनंदाची छटा उमटली, तेव्हा पोस्टमनने त्याला,अरे काय झाले म्हणून आश्चर्याने विचारले तेव्हा.मला शिक्षकाची नोकरी लागली अशी आंनदाची वार्ता सांगितली,आणि गोविंद बिडीची तल्लफ असलेल्या त्या पोस्टमनला दोन गोविंद बिड्या नाहीतर बिडीचा कट्टा आणि काडीपेटीच देवून टाकली.ही निवडीची बातमी पोस्टमनने गावभर केली.हा आपल्या आजपर्यंतच्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा क्षण असल्याचे ते सांगतात.

शिक्षकपदी नियुक्तीःशिक्षक भरती निवड मंडळाच्या आदेशानुसार नजीउल्ला शेख हे जिल्हा परभणी,तालुका जिंतूरमधील सांगळेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दाखल होवून २२ जुलै १९९६ रोजी रुजू झाले. या गावात पुढे सलग चार वर्षे त्यांनी येथे अध्यापनाचे काम केले.नंतर स्वजिल्हा लातूरमध्ये त्यांची जिल्हा बदलीने बदली झाली.२००० मध्ये ते जोडजवळा ता.जि.लातूर येथील प्राथमिक शाळेत ते कार्यरत झाले. इथे एकदोन नव्हे तर तब्बल सात वर्षे त्यांनी अध्यापन कार्य केले. आणि समयोजनाने त्यांची कासारखेडा येथे बदली झाली,याही गावात ते साडेसहा वर्षे कार्यरत होते. पुढे तालुका बदल आणि आपसी बदलीने जून २०१३ साली ते खरोळा येथील केंद्रीय जिल्हा परिषद कन्या शाळेत रुजू झाले.२०१७-२०१८ मध्ये पुन्हा ऑनलाईन बदलीच्या प्रक्रियेत त्यांना लातूर जवळील नांदगाव केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत काम करण्याची संधी मिळाली. आजही ते येथेच कार्यरत आहेत. विशेष म्हणजे त्यांच्याकडे केंद्रीय प्रभारी मुख्याध्यापक पदाची अतिरीक्त जबाबदारी आलेली आहे. आपल्या शाळेतील दररोजचे अध्यापन आणि हा केंद्रीय भार ते लिलया सांभाळत आहेत. ते करणार्‍यालाच समजते.

उच्च शिक्षणःनजीउल्ला शेख हे दहावी डी.एड या शैक्षणिक अर्हतेवर समाधान मानणारे नव्हते,त्यांनी औसा येथील कुमारस्वामी महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ केंद्राच्या बी.ए. वर्गाला प्रवेश घेवून पदवी पूर्ण केली आहे. एवढेच नव्हे डीएसएम(डिप्लोमा ईन स्कूल मॅनेजमेंट) हा कोर्सही पूर्ण केला आहे.पुढे शैक्षणिक संप्रेक्षण हा एम.ए.चा प्रथम वर्ष केला.दुसरा वर्ष बाकी आहे.तेही पूर्ण करण्याचा त्यांचा इरादा आहे.

समव्यवसायी पत्नीःमाणसाच्या जीवनातील विवाह ही एक महत्वाची घटना आहे.गुरुजींच्या पेशाला साजेसे आणि डी.एड.शिक्षण पूर्ण झालेले स्थळही त्यांना मिळाले. लातूरच्या उस्मानपूरा येथील रहिमाबेगम शेख यांच्याशी त्यांचा दि.२३ मे १९९९ रोजी धार्मिक विधीनुसार विवाह पार पडला.त्यांची कासारगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेवर गुणवत्तेनुसार प्रथम नियुक्ती मिळाली.पुढे त्यांनाही लातूर पंचायत समितीचा तालुका स्तरीय शिक्षक गौरव पुरस्कार मिळाला आहे.

मुलेही उच्चशिक्षितः शेख पती-पत्नी शिक्षकी पेशात असल्याने त्यांनी आपल्या मुलांच्याही शिक्षणावर भर दिला. आज त्यांचा थोरला मुलगा एमएस्सी, तर लहान मुलगा बीबीए द्वितीय वर्षे करतो आहे.

लेखन प्रपंचः शेख गुरुजींनी शैक्षणिक अध्यापनाच्या कार्यबाहुल्यातून वेळ काढून वृत्तपत्रातून लेखन करण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षण आपला हक्क आहे आणि अंधश्रध्दा निर्मूलनामध्ये संतांचे कार्य यासारखे लेख वृत्तपत्रातून लिहून त्यांना आपली लेखन कला दाखविली आहे.

अनेकांचा स्नेहः माणसाच्या जडणघडणीत अनेकांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष साथ मिळालेली असतो आणि माणूस त्याची काळजाच्या कप्प्यात साठवणूक करत असतो,नजीउल्ला यांना गावच्या सार्वजनिक ग्रंथालयामुळे वाचनाची सवय जडली,ते महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या अंधश्रध्दा निर्मूलनाच्या कार्याच्या बातम्या वाचून प्रभावीत झाले.त्यांनी त्यांचा पत्ता शोधून,या कार्यात सहभागी होण्याची पोष्टकार्डद्वारे त्यांच्याकडे ईच्छा व्यक्त केली.त्यांनी लातूर जिल्हाध्यक्ष माधव बावगे यांच्या संपर्क साधण्याचा सल्ला दिला.त्याप्रमाणे ते राजर्षी शाहू महाविद्यालयात बावगे यांना भेटले.आणि इथून ते अंनिसशी जोडले गेले.पुढे साथी रामकुमार रायवाडीकर,अनिल दरेकर, सुधीर भोसले, बाबा हालकुडे आदिंशी विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने कायमचे जोडले गेले,त्यामुळे त्यांचा सामाजिक सेवेचा एक प्रकारचा आत्मविश्वास दुणावला.अंनिसमध्ये ते अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत.एका शिक्षकाचा वैज्ञानिक दृष्टिकोण जागविण्यासाठी आवश्यक असलेला परिवार त्यांना यानिमित्ताने लाभला, असल्याची कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली.तानाजी रोंगे,शिवाजी गावकरे,मुसा मुजावर,गंगाधर मुळजे,चाँदपाशा पठाण,बलराज जाधवर,इंजिनिअर सिद्दीकी साहेब,कृषीमित्र बालाजी दहिफळे यांचाही आपल्या घडणीत वाटा असल्याचे ते म्हणाले.

रक्तदानात सहभागः केवळ शाळा,अध्यापन यापलिकडे जात नजीउल्ला शेख यांनी मानवतावादी भावनेतून अनेकदा रक्तदान शिबिरात सहभाग घेवून अकरा वेळा श्वेच्छा रक्तदान करुन राष्ट्रीय भावना दाखवून दिली.



बालविवाह रोखलेःशेख गुरुजींनी चाकोरीबाहेर जात सामाजिक भावनेतून,शासनाच्या आदेश,निर्णयाचा अंमल व्हावा यासाठी कार्य केले.आपल्या अवती भोवती सर्वसामान्य परिवारातील काही पालक अनेक कारणाने विशेषतःकायद्याचे अज्ञान,गरीबी असल्याने आपल्या अल्पवयीन मुला-मुलांचे विवाह लावून मोकळे होते,त्यांचे पुढे शारीरिक दुष्परिणाम काय होतात,याची त्यांना कल्पना नसते,कायद्याचे उल्लंघन केले तर गुन्हे दाखल होवू शकतात.ही वाईट वेळ त्यांच्यावर येवू नये म्हणून त्यांचे प्रबोधन करणे,त्यांच्या अडचणी समजून घेणे गरजेचे आहे,त्यांच्या एका अल्पवयीन विद्यार्थीनीच्याच बालविवाहाची पत्रिकाच त्यांच्या हातावर पडली आणि त्यांना या लग्नासाठी येण्याचा आग्रही विनंती झाली.तथापि ते अस्वस्थ झाले.त्यांनी मुलीच्या पालकांची भेट घेतली तेव्हा त्यांना मुलीचे आई-वडील नाहीत,आम्ही नातेवाईक पती-पत्नी कामानिमित्त नेहमी बाहेर असतो,ही लहान मुलगी घरात राहते,काही झालं तर काय करायचं,नवरा मुलगा जवळचा,चांगल्या स्थितीतला म्हणून लग्नाची घाई करतोय असे सांगण्यात आले.त्यावर गुरुजींनी त्यांचे प्रबोधन करुन तो विवाह अखेर दोन वर्षे पुढे लांबविला.नजीउल्ला शेख यांनी सर्वसामान्य घरातील अकरा अल्पवयीन पाल्यांचे बालविवाह रोखले आहेत

अंधश्रध्देला ठोकरःशिक्षक,कर्मचारी अधिकारी असो वा बहुतांश सर्वसामान्य नागरिकांमध्ये आजही भूतखेत,जादूटोणा,करणी भानामती याबद्दल एक प्रकारची भीती आहे,पण शेख गुरुजी याला अपवाद आहेत, ते एक तर विज्ञाननिष्ठ व्यक्तीमत्वाचे असून,महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या कामात तनमनधनाने सामील आहेत.त्यामुळे त्यांना अशा अवैज्ञानिक गोष्टीवर विश्वास नाही,हे त्यांनी प्रत्यक्ष जगून दाखविले तर ते असे की एके दिवशी नांदगाव येथील शाळा परिसरात त्यांना कुंकू,हळद,चोळी,चोळीचा खण,साडी,नारळ अशा वस्तू कोणीतरी टाकून गेल्याचे आढळून आले.अन्य शिक्षक सहकारी आणि विद्यार्थी त्यामुळे दचकले पण शेख गुरुजींनी त्यातला नारळ उचलला आणि म्हटले, हा मी आता खाणार,आणखी कोण कोण खाणार आहे,असे विचारले पण मोठे विद्यार्थी आणि सहकारी शिक्षकही त्यासाठी पुढे येईनात.मग गुरुजींनी न भिणार्‍या लहान मुलांसमवेत तो नारळ फस्त करुन यात काहीही जादू टोणा-भूत नसते हे दाखवून दिले.

पर्यावरणप्रेमीः पर्यावरणाचे संतुलन राखणे हा कळीचा मुद्दा बनला आहे. ते सर्वांचे आद्य कर्तव्य ठरले आहे.झाडे वाचवा,श्वास वाचवा असं म्हणण्याची वेळ येत आहे,अशा वेळी सर्वांनी सजग राहणे आवश्यक आहे.बालपणापासूनच गुरुजींना वृक्षाविषयीचे प्रेम आहे.वृक्ष लागवड करुन,त्यांचे संगोपन करण्यात त्यांना स्वारस्य आहे. राहते घर असो,शाळेचा परिसर असो,सार्वजनिक जागा असो की आपली शेतीवाडी येथे वृक्षांची लागवड करण्याची त्यांची धडपड चालू असते. अगदी स्वतः च्या शेतीच्या बांधावर आंबा,चिकू, चिंच,जांभळ,शेवगा,नारळ आदी फळे,भाजी पाल्याची अनेक झाडे लावून त्यांचे योग्य प्रकारे संगोपन केले आहे. एवढेच नाही तर पाणी आडवा,पाणी जिरवा साठी त्यांनी आपल्या घरावर रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा कार्यान्वित केली आहे.

शाळेबाहेरचे आत घातलेःआर्थिक परिस्थितीमुळे,व्यसनी पालकामुळे,किंवा आई,वडील नसल्यामुळे,असले तरी ते बालकांच्या शाळेबद्दल दक्ष नसतील तर शाळेच्या प्रांगणा ऐवजी,गॅरेज,हॉटेल्स,गुरांच्या मागे,शेळ्यांच्या मागे लावले जातात,नाविलाज म्हणून ती बालके तिथे बांधले जातात, अशा वेळी सुजान नागरिकांनी त्यांची परिस्थिती समजून घेवून त्याला शाळेच्या वर्गात नेण्यासाठी पुढे आले पाहिजे,ही भावना शेख गुरुजींच्या मनात खोल घर करून आहे,त्यांच्या या मानवतावादी मनोभूमिकेमुळे ६ ते १४ वर्षे वयोगटातील सोळा बालकांना जिल्हा परिषद वा खासगी शाळेत जाता आले आहे,त्यातील काही मुले आज दहावीच्याही पुढे शिक्षण घेत आहेत.याबद्दलचा अभिमान त्यांच्या चेहर्‍यावर ओसंडून वाहत असतो.

अनेक पुरस्कारःकाम करणार्‍या व्यक्तीची त्यातल्या त्यात उल्लेखनीय आणि हटके काम करण्याची दखल घेतलीच जाते,नजीउल्ला शेख यांच्या चाकोरीबाहेरच्या कामाचीही पावती त्यांना विविध पुरस्काराच्या रुपाने लाभलेली आहे.२०१८-२०१९ चा रेणापूर पंचायत समिती शिक्षण विभागाने त्यांना तालुकास्तरीय गुरुगौरव पुरस्कार देवून दि.५ सप्टेंबर २०३ रोजी गौरविले आहे.सहारा एज्युकेशन अँड वेल्फेअर फाउंडेशन परभणीचा २०१८ मध्ये गुरुगौरव पुस्कार मिळाला आहे.भारतीय दलित साहित्य अकादमीची डॉ.बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप नॅशनल अवॉर्ड् २०१९ मध्ये लाभली,कोरोना काळातील कामासाठी समुदाय आरोग्य अधिकार्‍यांनी त्यांना कोरोना योध्दा म्हणून सन्मानीत केलेय.असे एक नव्हे तर १ राष्ट्र,१३ राज्यस्तर,दोन जिल्हास्तरीय आणि एक महाराष्ट्र शासनाचा तालुकास्तरीय पुस्कार त्यांना मिळाले आहेत.

पालकाच्या भूमिकेतले गुरुजीःशांत,संयमी,निगर्वी,मनमिळावू,निर्व्यसनी,अध्यापनात रमणारे,पडेल तो भार तेवढ्याच कुशलतेने वाहणारे नजीउल्ला शेख यांनी आपल्या वयाच्या ४९ वर्षातील २९ वर्षीय सेवाकाळात नेहमीच पालकांच्या भूमिकेतून वर्तन केले आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणिवा निर्माण करणे,अज्ञान,अहिंसा,सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता,एकमेकांप्रती आदरभाव,लहान सहान उत्सवातून पर्यावरणपुरक वातावरण करणे,मुलांमधील न्यूनगंड दूर करणे,स्वावलंबन यावर त्यांचा भर राहिलेला आहे.मतदान वाढ जागृतीसाठी शाळेत कार्यक्रम राबविला. अशाच पालकांच्या भूमिकेत वावरत या देशाचे सुदृढ,वैज्ञानिक,सुजाण,गुणवान नागरिक घडविण्यासाठी धडपडणार्‍या तमाम गुरुजनांनासह नजीउल्ला शेख यांना सादर प्रमाण..!

बाळ होळीकर

*********

लातूर

मो.नं.९१७५१०३७६७

# आजच्या आणि पूर्वीच्या शिक्षकातील सरस निरसता

आजचे शिक्षक हे पूर्वीच्या शिक्षकांपेक्षा सरस आहेत का? हे सांगणे खूप अवघड झाले आहे. आधी पण शिक्षक चांगले होते आणि आता सुद्धा शिक्षक चांगले आहेत. प्रत्येक नोकरी प्रमाणे काही शिक्षक आधी पण चांगले नव्हते आणि आता सुद्धा चांगले नाहीत. आधी शिक्षकांना तुटपुंज्या पगारावर काम करावे लागायचे आणि पदोन्नतीच्या संधी कमी होत्या. पण आता तसे नाही. शिक्षकांना चांगला पगार आहे. पदोन्नतीच्या संधीही उपलब्ध आहेत. कार्यक्षम आणि मेहनत घेणा-या व्यक्तींची नेमणूक होण्याची गरज आहे. शिक्षक हा आपल्या ज्ञानार्जनातून पिढी घडवत असतो. म्हणून फक्त सर्वोत्तम व्यक्तींनीच या क्षेत्रात उतरावे.

पण दुर्दैवाने नेमणुका करतांना बोकाळलेला भ्रष्टाचार बघता नवीन रुजू होणारे बहुतांशी शिक्षक पैसा देऊन ती नोकरी विकत घेत असतात. मग लाखो रुपये देऊन नोकरीला लागलेल्या शिक्षकांकडून तो चांगले शिकविल ही अपेक्षा आपण कशी करावी? चांगला पगार आहे, सर्वोत्तम व्यक्तींची निवड करून नेमणूक केली, तर विद्यार्थ्यांना चांगले शिक्षक मिळतील. पण तसे होताना दिसत नाही. इतर नोकरीत आठवड्यात ४० तास काम करावे लागते. तुलनेत शिक्षकांना काम कमी असते. शिक्षकांनी त्या फावल्या वेळेचा उपयोग स्वतःला अद्यावत करण्यासाठी वापरावा ही अपेक्षा असते. त्यांचे काही मित्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रम मंडळात आहेत. अभ्यासक्रम बदलायचा तथा अद्यावत करण्याचा प्रयत्न केला तर प्राध्यापक मंडळी विरोध करतात. कशाला आमचे काम वाढवता असे त्यांचे म्हणने असते. कारण कधीतरी दहा-पंधरा वर्षांपूर्वी एखाद्या हुशार विद्यार्थ्याने तयार केलेल्या नोट्स वापरून शिकवण्याची सवय झालेली असते.

आज फार फरक दिसून येतो. निश्चितपणे चांगल्याकडून वाईटपणाकडे झाला आहे. शिक्षकातील काहीजण त्यांच्या वागण्यामुळे मान देण्यास पात्र नाहीत, तर अट्टल गुन्हे आणि गैरवर्तन करणारे आहेत. शिक्षक म्हणून पदाचा गरिमा म्हणजे पदाचा आब राखणे, पदाची गरज, पावित्र्य व शान राखणे हे खरे तर त्यांचे कर्तव्य आहे. पण यातच अनेक जण वाईटरित्या उघडे पडतात. जसे दारू पिऊन मुलांसमोर येणे, आश्रम शाळेत मुलींबरोबर बलात्कार करणे, व्यसन करणे, शाळांतील पैसा खाणे, न शिकवणे, वाईट भाषा वापरणे, पेपर फोडणे, पैसे घेऊन मार्क देणे, मुलांकडून घरची कामे करून घेणे, बेशिस्त वर्तन, मुलींना फुस लावून पळवून नेणे अशा काही प्रकरणातून त्यांचे गुण उघड होताना दिसून येते.

जर शिक्षक त्यांचे काम व्यवस्थित करत नसतील तर त्यांना सरळ टर्मिनेट करावे. कारण शिक्षकच आता खोट्या गोष्टी करून, भ्रष्टाचार करून टीईटी देतात. त्यात खोटेपणा करतात. आता शिक्षकांना परीक्षा नको म्हणतात. मुलांच्या खोट्या हजेरी लावून पगार घेणे, मुलींशी गैरवर्तन करणे असे सर्व दुर्गुण हल्ली त्यांच्यात भरले आहेत. हे पेपर मध्ये येणा-या विविध बातम्या वाचून कळते. खांद्यावर हात ठेवणे हे त्या व्यक्तीचे गुण जेव्हा मुलांसमोर येतात तेव्हा आदर्शच असावे. जसे तोंडात पानाचा तोबरा, हातात सिगरेट हे सर्व चुकीचे आहे. त्यांच्या वागण्यामुळे आज असे करणारे शिक्षक त्यांचा मान सन्मान हरवून बसले आहेत आणि आदरयुक्त मानसन्मान मिळवणे नाही, तर नाव कमावणे ही पूर्णपणे त्यांचीच जबाबदारी आहे.

पूर्वी शाळेतला शिक्षक सोडला, तर इतर कुठूनही ज्ञान मिळण्याची व्यवस्था नव्हती. आई-वडील शिकलेले असतील तर थोडी मदत होत असे. पण मुलांना शिकवण्याचा पूर्ण भार शाळेवर होता. एकदम 'ढ' विद्यार्थी शिकवणी लावायचा. यामुळे इतर मुलं चिडवायची आणि ते पालकांना परवडत सुध्दा नव्हते. पूर्वी शिक्षा करण्याचा अधिकार होता. त्यामुळे शिक्षक मुलांना चोपून काढू शकत होते आणि घरी कळलं तर घरून वेगळा मार बसायचा. त्यामुळे मनात शिक्षकांविषयी भिती होती. गुरु म्हणजे देव असतो. शिक्षक कसाही असला तरी तो व्यक्ती आपल्याला ज्ञान देतो आहे, तो गुरु आहे असे संस्कार होते. त्यामुळे गुरु विषयी अपशब्द वापरले जात नव्हते. पूर्वी शिक्षक आपल्या कामाशी प्रामाणिक होते (सगळेच नाही पण मोठ्या प्रमाणात). ज्ञानदान करणे पुण्य कर्म मानले जायचे, त्यामुळे शिक्षणाचा दर्जा चांगला होता. कितीही वर्ष शिकवत असले तरी आपल्या विद्यार्थ्यांना हे शिक्षक ओळखू शकत होते. म्हणजे हजारो मुलांना शिकवलं तरी हा माझा विद्यार्थी असा प्रत्येकाशी त्यांचा भावनिक बंध होता. मुलांच्या मनात सुद्धा शिक्षकांविषयी प्रेम आणि आदर होता.

आताची परिस्थिती काय आहे? माहितीच्या उपलब्धतेमुळे माहिती सगळीकडे नदी सारखी वाहत आहे. मोबाईल उचलला की हवी ती माहिती मिळते. मग शिक्षक कशाला हवे? शिवाय शिकवणी वर्ग आहेतच की जिथे पैसे भरून ज्ञान मिळवता येतं. शाळेत का लक्ष द्यायचं? मुलांना काही म्हणण्याची मुभा नाही. मारणे तर दुरच मुलांना शिस्त लावण्यासाठी काही बोलणे सुध्दा शिक्षकांना कठीण होऊन बसले आहे. लगेच पालक शाळेत धावून जातात. त्यामुळे नोकरी जाण्याची भिती असते. आजकाल शिक्षक सर्विस देतो, ज्ञान नाही. अभ्यासक्रम पूर्ण करणे, मुलांचे मनोरंजन करणे आणि त्यांना परिक्षा उत्तीर्ण करण्यासाठी मदत करणे हे आजच्या शिक्षकाचे काम आहे. मी शाळेत जातो, दिलेला तास शिकवतो आणि पगार घेतो. मुलांच्या भविष्याशी माझे काही देणे घेणे नाही. पालक सरळ असे म्हणतात की, असा कसा माझा मुलगा-मुलगी नापास झाले. काय शिकवता तुम्ही? पैसे भरले आहेत तर मुलं पास झालीच पाहिजे. अशाप्रकारे पालकांची अरेरावी वाढत जात आहे.

ही झाली वरवरची कारणे, तर मुळ मुद्दा काय आहे? आजकाल ज्ञान फार कमी मुलांना हवं आहे. मुलांना फक्त पदवी प्राप्त करायची आहे. असं का? तर आपला अभ्यासक्रम फार जूना आहे, नवीन गोष्टी त्यात शिकवल्या जात नाहीत. एक इंजिनिअर जेव्हा पदवीधर होतो तेव्हा बरेचदा त्याला नोकरीवर जे काम करायचे आहे ते येतच नसते, ते शाळा, कॉलेज मध्ये शिकवले नसते. त्यासाठी कंपनीत वेगळे प्रशिक्षण देण्यात येते. मग शिक्षक जे शिकवतो त्याचा उपयोग काय? ऐकलं काय आणि नाही ऐकलं काय सारखंच. फक्त नावापुरतेच तास करायचे, शिकवणी वर्ग लावायचे आणि उत्तीर्ण झाले की काम झालं.

आजकाल मुलं शाळेत, महाविद्यालयात मौजमजा करण्यासाठी जातात. काही नावाजलेले शाळा-कॉलेज सोडली, तर इतर ठिकाणी नुसता बाजार भरला आहे. ग्रामीण भागातील सरकारी शाळेत शिकलेल्या मुलांना साधं अक्षर ज्ञानसुध्दा नसतं. ती मुलं शाळेत जातात ते विविध योजनेतून तांदूळ, जेवण मिळवण्यासाठी आणि शिक्षक येतात ते पगारासाठी. यातूनही जर एखादा शिक्षक शिस्त लावण्याचा प्रयत्न करतो, तर शाळा, कॉलेज प्रशासन त्यांनाच बाहेरचा रस्ता दाखवतात. काही ठिकाणी रेटिंग सिस्टीम असते, म्हणजे वर्ष अखेरीस मुलं आपल्या शिक्षकांबद्दल फिडबॅक देतात. ते शिक्षक चांगले आहेत की नाही वैगरे. या रेटिंगवर शिक्षकांचे वेतनवाढ, पदोन्नती या गोष्टींचे निर्णय घेण्यात येतात. मग शिक्षक का मुलांशी पंगा घेईल? शिक्षक मग मित्रांसारखाच वागेल ना.

जेव्हा दोन मुलं अभियांत्रिकीला असताना एक सिनीयर असतो, जो दरवर्षी नापास होतो आणि शेवटच्या वर्षाची परीक्षा सोबत देते, ते त्यातही नापास होते. चार वर्षांची अभियांत्रिकीची पदवी त्यांनी आठ वर्षांत मिळवली. आज ते एका पोलीटेक्निक विद्यालयात शिक्षक आहेत. मी असं म्हणत नाही की ते शिकवू शकत नाही. ते मुलांना भरपूर इंटर्नल मार्क्स देतात. मुलांसोबत त्यांचे फोटो फेसबुकवर सतत येत असतात आणि त्यांना दरवर्षी छान रेटिंग मिळतं. अशी देवाण घेवाण चालते. बाकी शिक्षणाचा खेळ खंडोबा झाला आहे. शेवटी काय? दोष फक्त शिक्षकांचा नाही, तर सिस्टीमचा आहे. पण राजकारणी लोक जोपर्यंत शाळा, कॉलेज चालवतील तोपर्यंत बदलाची शक्यता आहे का? निश्चितच नाही.

*****

शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे

कमळवेल्ली,यवतमाळ

भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

# बाप्पाला निरोप – श्रध्दा, उत्साह आणि पर्यावरणाची जबाबदारी !

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा आत्मा आहे. दहा दिवस भक्तिभावाने घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांत विराजमान झालेल्या गणरायाचा निरोप म्हणजेच गणेश विसर्जन. 'गणपती बाप्पा मोरया, पुन्हा वर्षी लवकर या' या गजरात नाचत–गात, ढोल–ताशांच्या तालावर, फुलांच्या वर्षावात गणेशाच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते. परंतु या जल्लोषामागे काही गंभीर प्रश्न दडलेले आहेत, जे आपण विसरतो. गणेश विसर्जन म्हणजे केवळ धार्मिक विधी नाही. मातीपासून तयार झालेली मूर्ती जलात विसर्जित करणे म्हणजेच गणेश पुन्हा पंचतत्त्वात विलीन होणे, जीवन आणि मृत्यूच्या शाश्वत सत्याचा स्वीकार करणे होय. त्यामुळे हा विधी आत्मचिंतन व अध्यात्माचा संदेश देणारा आहे. गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशोत्सव साजरा केला जात असतो. गणेश चतुर्थीपासून गणपती बाप्पा संपूर्ण देशभर आपल्या भक्तांच्या घराघरात विराजमान होतात. गणेशोत्सव सुरू झाल्यानंतर दहाव्या दिवशी संपतो, जेव्हा मूर्ती सार्वजनिक मिरवणुकीत संगीत आणि सामूहिक मंत्रोच्चारात नेली जाते, त्यानंतर नदी किंवा समुद्रासारख्या जवळच्या पाण्यात विसर्जित केली जाते, ज्याला विसर्जन म्हणतात. गणेश विसर्जनाच्या वेळी मंत्रोच्चार केल्याने गणपती बाप्पा प्रसन्न होतो आणि भक्तांवर आशीर्वादाचा वर्षाव करतो आणि त्यांना जीवनात सुख, समृद्धी आणि आनंद देतो. घरांमध्ये आणि सार्वजनिक पंडाल (मंडप) मध्ये गणेशमूर्ती स्थापित करणे आणि त्यानंतरचे विसर्जन हे विश्वातील निर्मिती आणि विघटन चक्राचे प्रतीक आहे.

विसर्जन मिरवणुका समाजातील ऐक्याचे द्योतक आहेत. वेगवेगळ्या समाजघटकांतील, पिढ्यांतील, वर्गांतील लोक एकत्र येतात. उत्साह, गजर, नृत्य, फुलांचा वर्षाव यातून 'सामूहिक आनंद' प्रकट होतो. परंतु हाच उत्साह कधी कधी बेभान होतो आणि ध्वनीप्रदूषण, वाहतूककोंडी, अपघात अशा समस्याही वाढतात. सर्वात गंभीर बाब म्हणजे विसर्जनामुळे होणारे जलप्रदूषण. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, रासायनिक रंग, प्लॅस्टिकच्या सजावटी या थेट नद्या, तलाव, समुद्राचे पाणी दूषित करतात. जलीय प्राण्यांचा मृत्यू होतो, पिण्याच्या पाण्यावरही परिणाम होतो. विसर्जनानंतर तलावांच्या काठावर विखुरलेले कचरे, फुलांच्या माळा, न वापरलेली सजावट हे शहराचे कुरूप चित्र दाखवतात. उत्सवाचा आनंद घेणे प्रत्येकाचे हक्क आहे. पण या आनंदासोबत निसर्गाची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे. मातीच्या मूर्तींचा वापर, नैसर्गिक रंग, कृत्रिम तलावांत विसर्जन, प्लॅस्टिक टाळणे हे उपाय आपण स्वीकारले पाहिजेत. अनेक शहरांमध्ये 'घरगुती विसर्जन तलाव' ही संकल्पना लोकांनी हळूहळू आत्मसात केली आहे, ही सकारात्मक बाब आहे.

बऱ्याच लोकांना वाटते की, गणेशाची प्राण प्रतिष्ठापना फक्त चतुर्थीलाच होते, तर तसे नाही. काही ठिकाणी प्रतिप्रदेला गणरायाची प्राण प्रतिष्ठापना केली जाते. प्रतिपदेपासून दशमीपर्यंत असे १० दिवस हा उत्सव साजरा केला जातो. काही ठिकाणी गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत असे १० दिवस गणेशोत्सव साजरा होतो. गणपतीची प्राण प्रतिष्ठापना केल्यानंतर त्याची पूजा करून विसर्जन करण्याचे हे व्रत एक किंवा दीड दिवसाचे आहे. पण उत्सवात आणखी रंगत आणण्यासाठी किंवा कित्येक जण नवस पूर्ण करण्यासाठी पाच दिवस, सात दिवसांनी गणेशमूर्तीचे विसर्जन करतात. त्यामागे कोणतेही शास्त्रीय कारण नाही. गणेशभक्त आपल्या हौसेनुसार गणेशमूर्तीचे विसर्जन दीड, दोन, पाचव्या किंवा सातव्या किंवा दहाव्या दिवशी करतात. हे दिवस आनंदात–उत्साहात गेल्यानंतर गणपती बाप्पाला निरोप देण्याची वेळ येते आणि नियमानुसार प्रथेनुसार गणेशाचे विसर्जन करण्याची प्रथा आहे.

गणपती विसर्जनाशी निगडीत अनेक गोष्टी आहेत. त्यापैकी एक म्हणजेच गणपतीला जल तत्वांचा अधिपती मानलं जातं. त्यांच्या विसर्जनाचं मुख्य कारण तर हेच आहे की, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपतीची पूजा–अर्चा करून त्यांना पुन्हा पाण्यात विसर्जित केलं जातं. म्हणजेच ते ज्याचे अधिपती आहेत तिथे त्यांना पोहोचवलं जातं. निसर्गाच्या प्रत्येकच गोष्टीचे एक चक्र आहे, ज्या गोष्टीची सुरुवात होते तिचा शेवट हा नक्कीच होतो. निसर्गाचा हा कालचक्राचा नियम गणेश विसर्जनातून दिसून येतो. निसर्गाच्या अंशापासून गणपतीची मूर्ती तयार होते आणि शेवटी निसर्गतःच ती विलीन होते. गणेश विसर्जनाच्या वेळेस विसर्जन हे फक्त मूर्तीचेच करायचे नसते तर आपल्यातील दुर्गुणांचे सुद्धा करायचे असते.

अनंत चतुर्दशीचा दिवस, एकट्या मुंबईत वर्षाला सुमारे दीड लाख मूर्तींचे विसर्जन केले जाते. गणपती विसर्जन पाण्यातच कां केले जाते, या विधी मागे सुध्दा काही धार्मिक कारणे आहेत. तसेच हिंदू धर्मात अनेक विधी हे निसर्गाशी निगडीत आहे. निसर्गाशी एकरूपता राखण्याचा संदेश वेगवेगळ्या पद्धतीने कायमच दिला जातो, गणपती विसर्जनांच्या बाबतीतही असेच आहे. ज्यावेळी महर्षी व्यास महाभारताची निर्मिती करत होते, त्यावेळी गणपती बाप्पा लेखनिकाची भूमिका बजावत होते. महाभारत लिहिण्याचे काम हे दहा दिवस अविरतपणे चालू होते. त्यामुळे गणपती बाप्पांनी शरीर गरम न व्हावे म्हणून अंगाला माती लिंपल्याचे उल्लेख आहे. हा गणपती बाप्पांचा विशेष अवतार असल्यामुळे त्यांना दहा दिवसानंतर जलसमाधी देतात अशी वंदता आहे. कदाचित या दहा दिवसात बाप्पाची ऊर्जा टिकून राहावी म्हणून नैवैद्यासाठी गोडधोड, मोदक वगैरे करण्याची परंपरा आहे. अहोरात्र लिहिण्याच्या कामामुळे शरीर उष्ण झाल्यामुळे पाण्यात डुबकी मारल्याविना गत्यंतर नव्हती असेही अख्यायिका आहे. त्यामुळे गणपतीचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दिवशी करतात.

गणेश विसर्जन हा आपल्या संस्कृतीतील श्रद्धा, भक्ती आणि एकात्मतेचा उत्सव आहे. मात्र तो पर्यावरणाच्या हानीचा कारणीभूत ठरू नये. 'बाप्पा पुन्हा वर्षी लवकर या'असे गजर करताना आपण त्याला प्रदूषित नद्या, रासायनिक कचऱ्याचा डोंगर दाखवला तर ती खरी भक्ती ठरेल का? आता वेळ आली आहे की श्रद्धा आणि जबाबदारी यांचा समतोल राखावा. गणेशोत्सव पर्यावरणपूरक झाला तरच आपले मोरया खऱ्या अर्थाने गजर ठरेल.

***********

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# राज्य महोत्सव : गणेशोत्सव

गणेशोत्सव हा महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात अतिशय उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा केला जाणारा महत्त्वपूर्ण सण आहे. श्री गणेश हे विघ्नहर्ता, बुद्धीचे दैवत व मंगलकार्याचे अधिपती मानले जातात. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यचळवळीच्या काळात या उत्सवाला सार्वजनिक रूप दिले. त्यामागचा उद्देश समाजातील एकता वाढवणे व स्वराज्याच्या लढ्यासाठी लोकांना एकत्र आणणे हा होता. त्यामुळे गणेशोत्सवाला सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिकही महत्त्व प्राप्त झाले. गणेशोत्सव हा फक्त धार्मिक उत्सव नसून तो समाजाला एकत्र बांधणारा, संस्कृती जपणारा आणि पर्यावरणपूरकतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उत्सव आहे. गणेशोत्सवाच्या काळात राज्यात मोठ्या प्रमाणात पर्यटन, त्यावर आधारित विविध उद्योग व व्यवसाय यांना मोठ्या प्रमाणात चालना मिळते. राज्याची परंपरा व संस्कृती जपली जाते. ही परंपरा आणि संस्कृती अधिक वृद्धिंगत व्हावी यासाठी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी आपला गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याची १८ जुलै २०२५ रोजी विधीमंडळात घोषणा केली. त्यानुसार शासनाने १४ ऑगस्ट २०२५ रोजी गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून जाहीर केले. गणेशोत्सवाला शासनाकडून राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आल्यानंतर या महोत्सवांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रम आणि इतर कार्यक्रम समन्वयनासाठी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई या कार्यालयाकडे जबाबदारी देण्यात आली.

घरगुती तसेच सार्वजनिक श्री गणेश मंडळे : या गणेशोत्सव काळात घरगुती आणि सार्वजनिक गणेश मंडळांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धे'चा या वर्षापासून तालुकास्तरापर्यंत विस्तार करण्यात आला. यात राज्यस्तरीय प्रथम विजेत्याला रूपये ७.५० लाख तर जिल्हास्तरावरीय प्रथम विजेत्यास रूपये ५० हजार आणि तालुकास्तरीय विजेत्यांना रूपये २५ हजार व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. आजमितीस महाराष्ट्रभरातील ४०४ पेक्षा जास्त मंडळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. घरोघरीच्या श्री गणेशांचे दर्शन व सार्वजनिक मंडळांच्या श्री गणेशांचे दर्शन घरबसल्या घेणे शक्य व्हावे यासाठी घरगुती व सार्वजनिक श्री गणेशांचे छायाचित्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले. पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या ीींिं://सरपशीहीीरीं.श्रिवाझर.ले.ळप/ या पोर्टलद्वारे मोठ्या संख्येने भाविक आपल्या श्री गणेशांची छायाचित्रे सर्व गणेशभक्तांच्या दर्शनासाठी अपलोड करत आहेत. या पोर्टलद्वारे आजवर २०० हून अधिक जणांनी आपल्या घरच्या व ७० हून अधिक सार्वजनिक मंडळांनी फोटो अपलोड केले आहेत. महाराष्ट्रातील प्रसिद्ध गणपती मंदिरे व प्रसिद्ध सार्वजनिक मंडळाच्या गणपतींचे थेट दर्शन जगभरातील गणेशभक्तांना एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे, याकरिता सुरू करण्यात आलेल्या पोर्टलला देखील गणेशभक्तांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभत आहे. या पोर्टलमुळे प्रामुख्याने मुंबईचा लालबागचा राजा, मुंबईचा राजा, खेतवाडीचा गणराज, पुण्याचा दगडूशेठ हलवाई, श्री सिद्धिविनायक मंदिरातील सिद्धिविनायकाचे दर्शन, अष्टविनायकांचे व टिटवाळ्याच्या गणपतीचे दर्शन एकाच क्लिकवर उपलब्ध झाले आहे. या दोन्ही पोर्टलमुळे जगभरातील गणेशभक्तांना घरबसल्या विविध जिल्ह्यातील व शहरातील गणपतींचे अतिशय सुलभ दर्शन होत आहे.

भजनी मंडळ : गणेशोत्सव काळात भजनी मंडळांचा मोठा सहभाग असतो. याच अनुषंगाने राज्यातील नोंदणीकृत तसेच भजन क्षेत्रातील शिखर संस्थांना रूपये ५ कोटी अनुदान देण्याबाबतची तरतूद करण्यात आली. राज्यात १८०० भजनी मंडळे नोंदणीकृत असून त्यांना प्रत्येकी २५ हजार रूपये अनुदान म्हणून देण्यात येणार आहे.

रील स्पर्धा : गणेशोत्सवाला रील स्पर्धेच्या माध्यमातून देश–विदेशात नवे आयाम मिळावे, यासाठी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या वतीने रील स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आलेले आहे. ही स्पर्धा राज्यातील महसूल विभागीय स्तर, राज्यस्तर आणि महाराष्ट्राबाहेर व भारताबाहेरील खुला गट अशा तीन गटात होत आहे. रील तयार करण्यासाठी पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर या थीम मध्यवर्ती ठेवून ३० सेकंद ते ६० सेकंदापर्यंत रील तयार करावयाची आहे. महसूल विभागीय स्तरावरील विजेत्या स्पर्धकाला प्रथम पारितोषिक २५ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक रुपये १५ हजार, तृतीय पारितोषिक १० हजार, उतेजनार्थ विजेत्यास ५ हजार अशा स्वरुपात पारितोषिक दिले जाईल. या स्पर्धेतील राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास १ लाख रुपये, द्वितीय पारितोषिक ७५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक ५० हजार रुपये, उतेजनार्थ पारितोषिक २५ हजार रुपये देण्यात येईल. तर महाराष्ट्र व भारताबाहेरील विजेत्या गटातील स्पर्धकाला प्रथम क्रमांकाचे १ लाख रुपये बक्षीस, द्वितीय क्रमांकासाठी ७५ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५० हजार रुपये, उतेजनार्थ म्हणून २५ हजार रुपये देण्यात येणार आहे.

विशेष उपक्रम : गणेशोत्सवाच्या १० दिवसाच्या काळात राज्याच्या प्रत्येक विभागात विशेष उपक्रम, स्पर्धा, रोषणाई आदींसह विशेष उपक्रम अंतर्गत ऑपरेशन सिंदूरद्वारे माजी सैनिकांचा जिल्हानिहाय सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आत्मनिर्भर भारत व स्वदेशी संकल्पना राबविणाऱ्या व्यक्तींचाही गौरव करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ड आशिष शेलार यांच्या संकल्पनेतील वर्ल्ड युनेस्को मानांकन मिळालेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी संकल्पना असे विविध विषय घेऊनही हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. श्री गणेशाला वंदन करण्यासाठी पु.ल.देशपांडे अकादमीकडून 'आला रे आला गणराया आला' या विशेष गीताचीही निर्मिती करण्यात आली.

जागतिक व्यासपीठ : गणेशोत्सवानिमित्त कलाकारांना महाराष्ट्र राज्याबाहेर देखील व्यासपीठ मिळणार आहे. याचाच एक भाग म्हणून २७ ते २९ ऑगस्ट, २०२५ दरम्यान वन संशोधन केंद्र डेहराडून या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आला. नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे १ सप्टेंबर २०२५ सांस्कृतिक कार्यक्रम झाला तर ३ सप्टेंबर २०२५ रोजी के एम गिरी सभागृह, बेळगाव या सीमावर्ती भागात गणेशोत्सवाचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले. सर सयाजीराव नगर वडोदरा गुजरात या ठिकाणी म्हणजेच ४ सप्टेंबर २०२५ रोजी भाग्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ५ सप्टेंबर २०२५ रोजी गोवा राज्यात मराठी बांधवांसाठी भव्य संस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. गणेशोत्सवाला राज्य महोत्सव दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशात एक भरीव वाढ झाली आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार, हे नक्की

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-

– संजय डी.ओरके,
विभागीय संपर्क अधिकारी

## कृष्ण जन्माष्टमीनिमित्त घरी बनवा पंजिरी आणि पंचामृताचा खास नैवेद्य; नोट करा पारंपरिक रेसिपी

कृष्ण जन्माष्टमी हा हिंदू धर्मातील एक अत्यंत पवित्र आणि आनंदोत्सवाचा सण आहे. भगवान श्रीकृष्णांचा जन्म भाद्रपद महिन्याच्या कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला, मध्यरात्री झाला असे मानले जाते. या दिवशी भक्तगण उपवास, जागरण, भजन–कीर्तन आणि विविध धार्मिक विधी करून भगवान कृष्णांची पूजा करतात. जन्माष्टमीच्या दिवशी भगवान कृष्णांना आवडणारे पदार्थ अर्पण करण्याची परंपरा आहे. त्यात विशेषत: पंजिरी आणि पंचामृत यांचा समावेश होतो.

पंजिरी ही तूप, गव्हाचे पीठ, साखर आणि सुकामेवा यापासून बनवली जाते. ही केवळ प्रसादासाठीच नव्हे, तर आरोग्यासाठीही उत्तम आहे. तिचा सुगंध आणि गोडसर चव मन मोहून टाकते. पंचामृत हे दुध, दही, मध, साखर आणि तूप या पाच पवित्र घटकांनी बनवले जाते. पाचही घटक शुद्धता, आरोग्य आणि शुभत्वाचे प्रतीक मानले जातात. पूजा विधीमध्ये भगवान कृष्णांना स्नान घालण्यासाठी आणि प्रसाद म्हणून पंचामृताचा वापर होतो. ही दोन्ही पाककृती अतिशय सोप्या, पौष्टिक आणि स्वादिष्ट आहेत. चला तर मग, जन्माष्टमीचा आनंद वाढवणाऱ्या या खास रेसिपीज सविस्तर जाणून घेऊया. कृष्ण जन्माष्टमी स्पेशल – पंजिरी रेसिपी साहित्य गव्हाचे पीठ – १ कप तूप – ट कप साखर पावडर – ट कप काजू – २ चमचे (चिरून) बदाम – २ चमचे (चिरून) पिस्ता – २ चमचे (चिरून) सुके खोबरे किस – २ चमचे वेलची पावडर – ट चमचा कृती यासाठी सर्वप्रथम कढईत तूप गरम करून त्यात गव्हाचे पीठ टाकावे. मंद आचेवर पीठ सतत ढवळत भाजावे, तोपर्यंत की ते सोनेरी रंगाचे व सुगंधी होईल. भाजताना काळजी घ्या, पीठ जळू नये. पीठ छान भाजल्यानंतर त्यात काजू, बदाम, पिस्ता व सुके खोबरे घालून २ मिनिटे परतावे. गॅस बंद करून मिश्रण थंड होऊ द्यावे.

पूर्ण थंड झाल्यावर त्यात साखर पावडर व वेलची पावडर मिसळावी. सर्व घटक नीट एकत्र करून प्रसाद म्हणून अर्पण करावे. गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी १० मिनिटांमध्ये बनवा चविष्ट बिस्किटांचे मोदक,लहान मुलं खातील आवडीने कृष्ण जन्माष्टमी स्पेशल – पंचामृत रेसिपी साहित्य दूध – १ कप दही – ट कप मध – २ चमचे साखर – २ चमचे तूप – १ चमचा वेलची पावडर – चिमूटभर तुळशीची पाने – २ ते ३ (ऐच्छिक) कृती यासाठी सर्वप्रथम एका पवित्र व स्वच्छ भांड्यात दूध घेऊन त्यात दही मिसळावे. त्यात मध, साखर, तूप घालावे. सर्व मिश्रण चमच्याने नीट ढवळावे. वेलची पावडर व तुळशीची पाने घालून पुन्हा मिसळावे. हे पंचामृत भगवान कृष्णांना अर्पण करावे व नंतर भक्तांना प्रसाद म्हणून द्यावे. F-Qs (संबंधित प्रश्न) जन्माष्टमी म्हणजे काय? हा भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचे स्मरण करणारा एक हिंदू सण आहे.

# सार्वभौम राष्ट्र निर्मात्या थोरांचा दिन

दरवर्षी आपल्या देशात आपण विविध प्रकारचे सण सर्व ठिकाणी मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरे केले जातात. त्याच प्रमाणे महत्त्वाचे काही दिन सुद्धा साजरे केले जातात. जसे की आपल्या देशाचा स्वातंत्र्य दिन, आपल्या देशाचा प्रजासत्ताक दिन, पर्यावरण दिन, जागतिक महिला दिन , मातृदिन , तंबाखू विरोधी दिन, असेच वेगवेगळे दिन सुध्दा आपल्या भारत देशात सर्व शाळा मध्ये व महाविद्यालयां मध्ये साजरे केले जातात .त्यादिनांचे पैकीच आज ५ सप्टेंबर हा शिक्षक दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो.

आपल्या भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन हे एक शिक्षक होते म्हणून त्यांचा हा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी सर्व विद्यार्थी आपल्या शिक्षकाप्रती प्रेम व्यक्त करतात. विद्यार्थी आपल्या शिक्षकांच्या पाया पडतात त्यांचे आशीर्वाद घेतात. त्यांना आदरपूर्वक नमस्कार करतात काही विद्यार्थी पुष्पगुच्छ देऊन तर काही विद्यार्थी एखादी भेट वस्तू देऊन आपले प्रेम व्यक्त करतात. शिक्षक हा समाजाचा निर्माण करता आहे. शिक्षक आपले सर्वात मोठे आणि महत्त्वाचे गुरु आहेत शिक्षकांना वैदिक काळापासूनच गुरुचे स्थान आहे. सर्व शिक्षक हे समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे महत्त्वाचे कार्य करतात.

देशाचे आदर्श नागरिक बनविण्याचे काम शिक्षक करतात. सर्वानी आपल्या शिक्षकांविषयी आदर पूर्वक सन्मान, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा आजचा दिवस आहे. शिक्षक हे केवळ आपल्याला पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर आपल्याला जगण्याची कला शिकवत असतात. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्याचे काम हे आमचे शिक्षक अहोरात्र करत असतात. शिक्षकामुळे आपण जीवनामध्ये बऱ्याच काही नवीन गोष्टी शिकत असतो. आजचे विद्यार्थी उद्याचे भविष्यातले शिक्षक, शास्त्रज्ञ, डॉक्टर , इंजिनिअर, लेखक, कवी , नेते, मंत्री, पुढारी आपल्या देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान काही विचारवंत तयार करण्याचे सामर्थ्य केवळ आणि केवळ शिक्षकांच्यामध्ये असते .

शिक्षकांमुळेच मुले चांगले विचार ग्रहण करीत असतात. आपल्या देशाने प्रथम चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहचण्याचा मान मिळविलेला आहे. आणि आता आपण सूर्याचा अभ्यास करण्यासाठी सुध्दा आदित्य नावाचे यान सोडलेले आहे. ह्या प्रगतीमध्ये आपल्या शिक्षकांचा वैज्ञानिकाना विद्यार्थी दशेत शिक्षण देण्याचे काम शिक्षकांनीच केल्यामुळेच त्या पदापर्यंत पोहचलेले आहेत. त्यामुळे आपल्या देशाची ज्या ज्या क्षेत्रात प्रगती होत असते. त्याचा पाया भक्कम करण्याचे महत्वाचे काम हे शिक्षकच करीत असतात. याचाच अर्थ प्रत्येक क्षेत्रात मैलाचा दगड हे आपले शिक्षक आहेत. हे कोणीही नाकारू शकणार नाही. कारण आपण जेव्हा पहिल्यांदा बालवाडीत शाळेमध्ये जातो तेव्हा आपल्याला जगाची काहीच माहिती नसते.

त्यावेळी हे शिक्षक आपल्याला बऱ्याच काही नवनवीन गोष्टी शिकवतात. सर्व वस्तूंची माहिती देतात. तसेच आपला आई–वडिलां पासून आपण शाळेत पहिल्यांदाच दूर राहतो तेव्हा आपली संपूर्ण जबाबदारी शाळेतील शिक्षक घेतात. म्हणूनच शिक्षकांना दुसरे पालक म्हटले जाते. आपले विचार किंवा मते घडविण्या मागे शिक्षकांचा सिंहाचा वाटा आहे. आपल्या पालकांनी शिक्षकांचेकडे एक प्रकारे चिखलाचा गोळाच सुपूर्त केलेला असतो. त्या चिखलाच्या गोळ्याला चांगली मूर्ती म्हणजेच आपल्या देशाचा एक आदर्श नागरिक घडविण्याचे काम शिक्षक हेच खूप परिश्रम घेऊन करत असतात .आपल्याला विविध चित्रा वरून वेगवेगळ्या वस्तूंची समक्ष माहिती करून देतात.

जगभराचे ज्ञान देतात. प्रार्थना शिकवतात ,आपल्यावर चांगले संस्कार करतात. गुरु शिष्य मधील हे नाते कायम ठेवण्यासाठी आणि आपल्या शिक्षकाचे कायम स्मरण ठेवण्यासाठी शिक्षक दिन साजरा केला जातो. काही शाळांमध्ये मुले एक दिवसासाठी शिक्षक बनतात आणि शाळेत विद्यार्थ्यांना शिकवतात. महात्मा ज्योतिबा फुले यांना शिक्षकांची नव्हेतर शिक्षणाची खूप आवड होती आणि त्यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये चांगले कार्य केले. महात्मा फुले केवळ नऊ महिन्याचे असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचा विवाह वयाच्या बाराव्या वर्षी माता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्याशी झाला. प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला.

त्यानंतर त्यांनी सन १८४२ मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या मिशन हायस्कूल मध्ये प्रवेश घेतला. महात्मा फुले यांची बुद्धी अतिशय तल्लख असल्यामुळे पाच सहा वर्षातच त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. आपल्या देशाचे ज्ञान आणि समाजाची जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी सन १८४८ साली पुणे येथील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात पहिली मुलींची शाळा काढली आणि त्याची जबाबदारी सावित्रीबाई यांच्यावर सोपवली . तसेच अस्पृश्य मुलांसाठी त्यांनी पुण्याच्या वेताळ पेठेत १८५२ मध्ये शाळा स्थापन केली.

हे सर्व कार्य करत असताना महात्मा फुले यांना अनेकांच्या विरोधात सामोरे जावे लागत असे. पण ते सर्व सहन करूनही ते आपल्या मतावर ठाम होते. शाळेच्या मुख्याध्यापक पदी असलेल्या पहिल्या भारतीय महिला म्हणजे माता सावित्रीबाई आणि त्याचप्रमाणे फक्त स्त्रियांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय असे थोर समाज सुधारक होते. आपल्या सर्व स्त्रियांना शिक्षणाचा प्रथम अधिकार मिळवून देणारे आपले खरे शिक्षक आहेत . शिक्षक दिनाच्या क्रांतिबा महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनाच आपण खूप खूप धन्यवाद दिले पाहिजेत.

शिक्षणाचे महत्त्व सांगणारे आणि त्यासाठी अथक प्रयत्न करणाऱ्या सर्व समाज सुधारकांना व आजी– माजी सर्व शिक्षक यांना शिक्षक दिनाच्या दिवशी मानाचा मुजरा केला तरी सुद्धा शिक्षण देनेसाठी केलेल्या कामाची आपण परतफेड करू शकत नाही. शिक्षणाचे महत्त्व सांगताना ते नेहमी म्हणत आपल्या देशाची प्रगती करायची असेल तर प्रथम येथील लोकांना शिक्षण दिले पाहिजे त्यासाठी त्यांनी विद्येचे महत्त्व पटवून देताना एक संदेश दिलेला आहे. तो आजही लोकांना बोधप्रद आहे तो असा की,

विद्ये विना मती गेली
मती विना नीती गेली
नीती विना गती गेली
गती विना वित्त गेले
वित्ता विना शूद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले.
– क्रांतिबा महात्मा ज्योतिबा फुले

त्यामुळे खऱ्या अर्थाने शिक्षक दिनाला क्रांतीबा ज्योतिबा फुले यांची आठवण झाल्या शिवाय राहत नाही. एवढे त्यांचे महान कार्य आणि विशेष म्हणजे ते कार्य सुद्धा स्वातंत्र्यपूर्व काळात केलेले आहे. त्यामुळे ते अधिक एखाद्या तेजस्वी ताऱ्यासारखे सतत कायम चंद्र सूर्य असे पर्यंत आपल्या भूतलावर चमकतच राहणार आहे. मला एकदा समाज माध्यमावर शिक्षकांची महती बाबत फार छान संदेश वाचावयास मिळालेला तो हिंदीमध्ये आहे.

सोच और समाज मे अंतर है.....
डॉक्टर चाहता है कि हर आदमी बीमार हो श्र
वकील चाहता है कि हर आदमी झगडालू हो श्र
पोलीस चाहती है कि हर आदमी जुलमी हो श्र
ठेकेदार चाहता है कि हर आदमी मजूर हो श्र
दारूवला चाहता है कि हर आदमी शराबी हो श्र
बँकवाला चाहता है की हर आदमी कर्जदार हो
नेता चाहता है कि हरआदमी भोला अनपढ हो
पुजारी चाहता है कि हर आदमी अंधविश्वास मे डुबा हो श्र
तांत्रिक जाता है कि हर आदमी भूत प्रेतो से डरता रहा हो श्र
लेकिन....एक शिक्षकही है जो हमेशा चाहता है कि हर स्त्री–पुरुष पडा लिखा हो और जीवन में सफलता प्राप्त करके आगे बडे जिसे स्वयं का अपने परिवार का मानव समाज का और देश का विकास करे श्र
आईए शिक्षक वर्ग का शिक्षक दिन पर सन्मान करे श्र

सर्व शिक्षक बंधू भगिनी यांना शिक्षक दिनाच्या खूप खूप हार्दिक शुभेच्छा. असाच शिक्षक दिन चंद्र सूर्य असे पर्यंत दरवर्षी मोठ्या आनंदाने आणि मोठ्या उत्साहाने आपल्या भूतलावर साजरा करणेसाठी सर्व शिक्षक/ शिक्षकांना दीर्घायुष्य मिळत राहो. हीच हार्दिक शुभेच्छा. सर्व वाचक बांधवांना शिक्षक दिनाच्या खूप खूप हार्दिक शुभेच्छा. म्हणूनच आपण म्हणू शकतो सार्वभौम राष्ट्र निर्मात्या थोरांचा दिन म्हणजेच शिक्षक दिन.

***********

लेखक
जी.एस.कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न. ७५८८५६०७६१

# खोपेगावच्या तंटामुक्ती अध्यक्षपदी चौथ्यांदा हनमंत मोरे यांची बिनविरोध निवड




लातूर / प्रतिनिधी :- लातूर तालुक्यातील मौजे खोपेगाव येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त ग्रामसभा उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या ग्रामसभेत अनेक विविध विषयांवर चर्चा झाली. त्यामधील महत्त्वाचा विषय म्हणजे तंटामुक्ती अध्यक्षपदाची निवड हा होता. या पदासाठी माजी अध्यक्ष हनमंत मुरलीधर मोरे यांनी पुन्हा उमेदवारी दाखल केली. मात्र त्यांच्या विरोधात कोणताही उमेदवार न आल्याने त्यांची सलग चौथ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली. ग्रामसभेत सर्व उपस्थित ग्रामस्थांनी एकमताने हात वर करून त्यांची निवड केली. यावेळी उपाध्यक्षपदी जगनराव शिंदे यांची निवड करण्यात आली. तसेच तंटामुक्ती समितीची नवी कार्यकारिणीही ग्रामसभेत निश्चित करण्यात आली व त्यांचा ग्रामपंचायतच्या वतीने मोठा जाहीर सत्कार करण्यात आला. ग्रामसभेचे अध्यक्षस्थान सरपंच सौ. सरस्वती मोरे यांनी भूषवले. सचिव म्हणून ग्रामपंचायत अधिकारी परमेश्वर शिरूरे यांनी कामकाज पाहिले. या वेळी उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, रोजगार सेवक, संगणक ऑपरेटर यांच्यासह शंभरहून अधिक गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हे तर आम्हाला फक्त बदनाम करण्याचे षढयंत्र माझ्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यां- विरोधात विनाकारण तक्रारी-गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर



केज/प्रतिनिधी लक्ष्मण बेडसकर हे केज गटशिक्षण कार्यालयाचा गटशिक्षणाधिकारी म्हणून प्रमाणिकपणे काम करत आहे. त्यांच्या विरोधात जाणून बुजून तक्रारी केल्या जात आहेत. यामध्ये बेडसकर यांना व शिक्षणविभागाला फक्त बदनाम करण्याचे काम सुरू असल्याचे केजचे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे. पुढे बोलताना बेडसकर म्हणाले की, मी सध्या केज येथील गटशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार आहे. मात्र या ठिकाणी काम करत असताना मला अनेक अडचणींना व संकटाला सामोरे जावे लागत आहे.एक गट जाणून बुजून माझ्याविरोधात सातत्याने षढयंत्र रचून मला व शिक्षणविभागाला सह वरिष्ठ अधिकाऱ्यांना आरोपीच्या कठड्यात उभा करण्याचे काम करीत आहेत माझ्यासह शिक्षण क्षेत्राची बदनामी करीत आहेत. माझ्यासह वरिष्ठअधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे बिनबुडाचे आरोपही केले जात आहेत. चुकीचे काम करणाऱ्यांना मी कधीही पाठीशी घालत नाही, मात्र विनाकारण माझ्यासह शिक्षणाधिकाऱ्यांवर बिनबुडाचे आरोप करून आम्हाला नाहक बदनाम केले जात आहे. यातून संपूर्ण शिक्षण विभागाला वेठीश धरण्याचे काम केले जाते. एका लाच प्रकरणात सन २०१३ मध्ये गुन्हा दाखल झाला मात्र यामागेही मोठे षढयंत्रच होते. यातील सत्य लक्षात घेवूनच या गुन्ह्यातून माझी मा.न्यायालयाने निर्दोष मुक्तता केलेली आहे. त्यामुळेच १६ नोव्हेंबर २०१३ ते ५ मार्च २०१६ हा सर्व प्रयोजनाकरीता सेवा कालावधी (कर्तव्य कालावधी) म्हणून मंजूर करण्यात आलेला आहे. हे सगळ लक्षात घेवूनच माझ्याकडे शिक्षणविभागाने केज येथील गटशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त पद्भार दिलेला आहे. त्यामुळे विनाकारण माझ्यासह वरिष्ठ अधिकारी व शिक्षणविभागाची बदनामी थांबवावी, असे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांनी मत व्यक्त केले आहे.

## आठ दिवसात गुंठेवारी प्रमाणपत्र नाही दिल्यास मनपा प्रशासनाविरुद्ध उपोषण करणार : अंकित बाहेती



लातूर : लातूर शहरातील सिग्नल कॅम्प परिसरातील सूत मिल रस्त्यावर असणाऱ्या आपल्या प्लॉटचे गुंठेवारी प्रमाणपत्र देण्याची मागणी आपण मनपाकडे मागच्या तीन महिन्यांपासून सातत्याने करत असूनही अद्यापपर्यंत आपल्याला ते देण्यात आलेले नाही. आठ दिवसात गुंठेवारी प्रमाणपत्र नाहीदिल्यास लातूर शहर महानगरपालिका प्रशासनाविरुद्ध उपोषण करणार असल्याचा इशारा अंकित बाहेती यांनी गुरुवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केला.

सूत मिल रोड परिसरात आपला व आपल्या पत्नीच्या नावे असलेल्या सिटी सर्व्हे क्रमांक ३६९९ /८ चा प्लॉट क्रमांक ८ हा आहे. या प्लॉटचे गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी मागणी आपण मनपा प्रशासनाकडे केली आहे, असे सांगून अंकित बाहेती म्हणाले की, या जागेचा जुना बांधकाम परवाना तत्कालीन लातूर नगर परिषदेकडून देण्यात आलेला होता. या प्लॉटवर आपल्याला आता नव्याने बांधकाम करावयाचे असल्याने नगर रचना विभागाकडे अर्ज सादर केला आहे. हा अर्ज करून तीन महिन्यांचा कालावधी उलटला तरीही अद्याप आपल्याला मनपाकडून गुंठेवारी प्रमाणपत्र दिले गेले नाही. आपण सादर केलेल्या कागदपत्रांची शहनिशा करून गुंठेवारी प्रमाणपत्राची वारंवार मागणी केली असता मनपा प्रशासनातील अधिकारी टाळाटाळ करत आहेत. तसेच लातूर मनपाच्या माजी सदस्या शितल मालू यांनी सदर जागेवर अतिक्रमण करण्यात आले असल्याचा आरोप केला असून तो आरोप खोटा असल्याचे सांगून अंकित बाहेती यांनी प्लॉट क्रमांक ८ बाबत न्यायालयात कुठलाही वाद चालू नसल्याचे सांगितले. आपण म्हणतोय ते जर खोटे आढळून आल्यास आपल्यावर संबधितांनी योग्य ती कार्यवाही करावी. आपण त्या कार्यवाहीला सामोरे जाण्यास तयार असल्याचेही बाहेती यांनी सांगितले. हा प्रकार मनपा प्रशासन काही मंडळींशी संगनमत करून आपले राजकीय करिअर खराब करण्याचा प्रयत्न करत आहे, एवढेच नव्हे तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नावाचा उल्लेख करून या विषयाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्नही जाणीवपूर्वक केला जात असल्याचे ते म्हणाले.

आपण मनपाकडे दाखल केलेले गुंठेवारी व जुन्या बांधकाम परवान्याची कागदपत्रे मागितले असता ते मनपा कार्यालयात उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले आहे. हा प्रकार मनपाच्या कार्यपध्दतीबद्दलच शंका निर्माण करणारा असल्याचे सांगून आपल्याला येत्या आठ दिवसात जर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात आले नाही तर मनपा कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशाराही बाहेती यांनी यावेळी दिला.

## लातूर शहरात बांधकाम परवानग्यांमध्ये अडचण, नागरिकांची गैरसोय, काँग्रेसचा आंदोलनाचा इशारा

लातूर: लातूर शहरातील नागरिकांना महानगरपालिकेतून बांधकाम परवाना मिळवण्यासाठी अनेक अडचणींना सामोरं जावं लागत आहे. विशेषतः 'लो रिस्क' (Low Risk) आणि 'मॉडरेट रिस्क' (Moderate Risk) बांधकाम परवानग्यांमध्ये होणाऱ्या विलंबाबद्दल लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या संदर्भात, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड.किरण जाधव यांनी महापालिका प्रशासनाला निवेदन देऊन या प्रश्नावर त्वरित तोडगा काढण्याची मागणी केली आहे. निवेदनाद्वारे म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीनुसार (UDCPR) लो रिस्क आणि मॉडरेट रिस्क बांधकाम परवानग्या देण्यासाठी स्वतंत्र कार्यपद्धती बीपीएमएस निश्चित केली आहे. या नियमानुसार १५०० चौ. फुटांपर्यंतच्या बांधकामासाठी परवानगी देण्याचे अधिकार वास्तुविशारद आणि अभियंत्यांना देण्यात आले आहेत, तर १५०० ते ३००० चौ. फुटांपर्यंतच्या भूखंडासाठी आवश्यक कागदपत्रे तपासणी करण्याचे अधिकार नगररचनाकार आणि नगररचनाकार यांनी नियुक्त केलेल्या व्यक्तींकडे आहेत. परंतु लातूर शहर महानगरपालिका बांधकाम परवानगी साठी ही UDPCR मधील नवीन योजना लागू करण्यात चाल ढकल करीत आहे, राज्यातील बऱ्याच महानगरपालिका मध्ये ही लो रिस्क आणि मॉडरेट रिस्क बांधकाम परवानगी योजना लागू करण्यात आली असून हजारो नागरिकांनी त्याचा लाभ घेतला आहे परतू लातूर म न पा प्रशासन या बाबतीत उदासीन असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे UDPCR मधील परिशिष्ट क नुसार नागरिकांना बांधकाम परवाना देण्यात यावा आणि नागरिकांना सुलभ आणि सोयीची



सुविधा उपलब्ध करून द्यावी जेणे करून नागरिकांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागणार नाही त्यांची गैरसोय होणार नाही . या साठी महापालिका प्रशासनाने त्वरित लक्ष घालून नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी लातूर काँग्रेसने निवेदनाद्वारे केली आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड.किरण जाधव यांनी या प्रश्नावर महापालिका प्रशासनाकडे तातडीने बैठक घेऊन मार्ग काढण्याची विनंती केली आहे, जेणेकरून नागरिकांना विनाकारण त्रास होणार नाही. अन्यथा काँग्रेस पक्ष यावर तीव्र आंदोलन करेल असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे, माजी उपमहापौर कैलास कांबळे, अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष प्रा.प्रवीण कांबळे, विष्णुकांत धायगुडे, सिकंदर पटेल, शरद देशमुख,प्रवीण सूर्यवंशी, नागसेन कामेगावकर, आसिफ बागवान, यशपाल कांबळे,राम स्वामी, किरण बनसोडे,ड. गणेश कांबळे, पवन गायकवाड, विजय टाकेकर,आकाश मगर यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पोलीस ठाणे वाढवणा हद्दीत तिरू नदीच्या पात्रात सुटकेसमध्ये आढळलेल्या अज्ञात महिलेच्या खुनाचा उलगडा - पाच आरोपी अटक.

लातूर:-पोलीस ठाणे वाढवणा हद्दीत तिरू नदीच्या पात्रात सुटकेसमध्ये आढळलेल्या अज्ञात महिलेच्या खुनाचा उलगडा - पाच आरोपी अटक.

याबाबत अधिक माहिती अशी की,वाढवणा पोलीस ठाणे हद्दीतील चाकूर-शेळगाव फाटा मार्गावरील तिरू नदीवरील पुलाखाली अज्ञात आरोपींनी अंदाजे २० ते २५ वयाच्या महिलेचा खून करून मृतदेह सुटकेसमध्ये टाकला व पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने नदीत फेकून दिला होता. दि. २४ ऑगस्ट रोजी संध्याकाळी परिसरातील शेतकऱ्यांना उग्र वास आल्याने त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. मृतदेह पूर्णतः कुजलेल्या अवस्थेत असल्याने महिलेची ओळख पटविणे अवघड झाले. त्यावरून पो.ठा. वाढवणा येथे गु.र. क्र. २३०/२०२५ कलम १०३(१), २३८ भा.न्या.सं. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी भेट देऊन पाहणी केली. घटनास्थळावरून मिळालेली ट्रॉली बॅग (इळस-थरू कंपनीची), मयताने परिधान केलेली अंतर्वस्त्र (खपपीशपलश), जर्किन (खत्र्ह्डजज कंपनीचे), डाव्या पायातील काळा दोरा, हातातील पांढऱ्या रंगाची बांगडी, कानातील दागिने व शवविच्छेदन अहवाल यांच्या आधारे तपासाची दिशा निश्चित करण्यात आली. अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विविध ५ पथके गठीत करण्यात आली.

:तपास पथकांची कामगिरी:

पथक-१: मृतदेह ठेवण्यासाठी वापरलेल्या ट्रॉली बॅगचा उत्पादक, पुरवठादार व विक्रेते शोधून काढणे.

पथक-२: अंतर्वस्त्र व बांगड्यांच्या उत्पादक/विक्रेत्यांकडून माहिती गोळा करणे.

पथक-३: महाराष्ट्र, कर्नाटक सीमावर्ती जिल्ह्यांतील तसेच गुजरातमधील हरवलेल्या महिला/मुलींच्या नोंदींची पडताळणी. या पथकाने तब्बल ३०० मिसिंग मुली व ७० अपहरण प्रकरणांची माहिती तपासली.

पथक-४: सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक माहितीचे विश्लेषण, प्रसारमाध्यमे व सोशल मीडियाद्वारे माहिती प्रसिद्ध करणे, मृत महिलेचे एआय स्केच तयार करणे व औद्योगिक भाग, साखर कारखाने, डाळ मिल परिसरात चौकशी करणे.

पथक-५:ह्यूमनइंटेलिजन्सच्याआधारेमागील काही दिवसांपासून बेपत्ता झालेल्या महिलांची गुप्त माहिती गोळा करणे.





दरम्यान पोलीस अधीक्षक अमोल तांबे हे नमूद पथकांनी केलेल्या कारवाईचा वेळोवेळी आढावा घेऊन त्याप्रमाणे पुढील रणनीती तयार करून पुढील कारवाई संदर्भात सूचना व मार्गदर्शन करत होते.

पोलीस अधीक्षक यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे पथकाकडून उदगीर, अहमदपूर, चाकूर येथील एमआयडीसी तसेच साखर कारखान्यामध्ये, डाळ मिल मध्ये काम करणाऱ्या कामगारांची त्यांच्या कुटुंबीयांची गोपनीय पद्धतीने माहिती मिळविण्यात येत होती. दरम्यान एका साखर कारखान्यात मेन्टेनन्स चे काम करणाऱ्या कुटुंबीयांवर त्यांच्या हालचालीवर पथकामार्फत लक्ष ठेवण्यात येत होते. कुटुंबातील एक महिला काही दिवसा अगोदरच अचानक गायब झाल्याची माहिती मिळाली होती. त्या अनुषंगाने पथक त्या महिलेच्या पतीच्या संशयीत हालचालीवर लक्ष ठेवून होते. संशयीत पतीने त्याचे बिंग फुटूनये म्हणून तो उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे येथे आपल्या पत्नीचा फोटो घेऊन पत्नीची मिसींग दाखल करण्यासाठी आला असता पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांनी व सदर महिलेच्या फोटोची व नमुद गुन्ह्यातील रेखाचित्राची पडताळणी केली तेव्हा त्यांचा संशय बळावल्याने त्यांनी पोलीस ठाण्याच्या पथकाद्वारे पतीचे सखोल चौकशी केली असता सदरचा गुन्हा त्यांनी केल्याचे निष्पन्न झाले.

त्याच्याकडे अधिक विचारपूस करता त्याच्याकडून माहिती मिळाली की, तो उत्तर प्रदेश मधील बडा सिक्किटा, जिल्हा कुशीनगर, उत्तर प्रदेश असे असल्याचे सांगून नमूद गुन्ह्यातील मयत ही त्याची पत्नी असून त्याचे नाव फरीदा खातून, वय २३ वर्ष असे असल्याचे सांगितले.

नमूद मयत ही मुलांसह उत्तर प्रदेशात राहत होती. जिया ऊल हक यास त्याची पत्नी फरीदा हिचे परपुरुषाशी अनैतिक संबंध असल्याचा संशय असल्याने त्यांच्यात नेहमी भांडण होत होते. नमूद मयत फरीदा ही काही दिवसापूर्वीच मुलांसह जीया उल हक याच्याकडे राहण्यास आली होती. जिया उल हक साखर कारखान्याने दिलेल्या खोलीत राहत होता. फरीदा हीच्या चारित्र्यावर संशय असल्याने जिया उल हक याने पत्नी फरिदा हिचा खून करण्याचा त्याच्या इतर साथीदारासोबत मिळून कट रचला. १५ ऑगस्ट रोजी साखर कारखान्यातील कामगारांची सुट्टी असल्याने जिया उल हक याने दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घरी असताना आपल्या साथीदाराच्या मदतीने मयत फरीदाच्या छातीवर बसून उशी तोंडावर दाबून गुदमरून श्वासोश्वास रोखून फरीदाचा खून केला व त्यानंतर फरीदाचा मृतदेह रॅली बॅगेत ठेवून स्थानिक ऑटो भाड्याने घेऊन साथीदारासह निघाला. वाटेत पुलाजवळ फरिदाचा मृतदेह असलेली ट्रॉली बॅग नदीत फेकून दिली. त्यावरून सदर पथकांनी तात्काळ वेगवान कारवाई करत काही तासातच गुन्ह्यातील मुख्य आरोपी व गुन्ह्यात मदत करणारे त्याचे अन्य

अटक आरोपी :-

१. जीया उल हक (वय ३४ वर्ष)
२. सज्ञाद जरूल अन्सारी (वय १९ वर्ष)
३. अरबाज जमलू अन्सारी (वय १९ वर्ष) - सर्व रा. बडा सिक्किटा, जि. कुशीनगर, उ.प्र.
४. साकीर इब्राहिम अन्सारी (वय २४ वर्ष) - रा. विजयपूर, ता. तमकोइराज, जि. कुशीनगर, उ.प्र.
५. आजम अली सजवाल अली उर्फ गुड्डू (वय १९ वर्ष) - रा. विजयपूर, ता. तमकोइराज, जि. कुशीनगर, उ.प्र.

असे असून सर्व आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. त्यांना अटक करण्यात आली आहे.

नमूद गुन्ह्यामध्ये काही एक विशेष माहिती नसतानाही पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी पथकांना वेळोवेळी केलेल्या सूचना व मार्गदर्शनामुळे तसेच पोलीस अधिकारी व अमलदारांच्या पथकांनी अथक परिश्रम घेऊन काहीएक उपयुक्त पुरावा व माहिती नसतानाही सदरचा गुन्हा उघडकीस आणून गुन्ह्यातील सर्व आरोपींना ताब्यात घेतले आहे.

सदर आरोपीतास आज रोजी मा.न्यायालयसमोर हजर केले असता त्यांना ५ दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे.

सदरची कामगिरी अमोल तांबे पोलीस अधीक्षक लातूर, यांचे मार्गदर्शनात मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लातूर, अरविंद रायबोले उपविभागीय पोलीस अधिकारी अहमदपूर, गजानन भातलवंडे उपविभागीय पोलीस अधिकारी उदगीर यांच्या नेतृत्वातील पथकामधील स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, वाढवणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड, चाकूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी भंडे, उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी, स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके, सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे, तसेच पोलीस ठाणे उदगीर ग्रामीणचे पोलीस उपनिरीक्षक देवकर, पोलीस अमलदार नामदेव चेवले , राजकुमार डबेटवार, सचिन नाडागुडे, महेबूब सय्यद, युवराज जाधव, राजकुमार देवडे , संदीप केंद्रे, राम बनसोडे, रवी चिमुले, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सफौ सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार युवराज गिरी, राजेश कंचे, रियाज सौदागर, विनोद चलवाड, साहेबराव हाके, अर्जुन रजपूत, संजय कांबळे, सुरेश कलमे, दिनेश देवकते, सिद्धेश्वर मदने, गणेश साठे, मनोज खोसे, तुळशीराम बरुरे, पाराजी पुठेवाड, जमीर शेख, बंडू नीटूरे, चंद्रकांत केंद्रे, प्रदीप चोपणे सायबर सेलचे पोलीस अंमलदार शैलेश सुडे यांनी केली आहे.

*******

मा.पोलीस उप-महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांनी सदर गुन्ह्यातील तपास पथकास रोख रु. २५,०००/- चे बक्षीस जाहीर केले आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE